# ‘मणिपूरमधील घटनेचे राजकारण करणे लज्जास्पद’



**नवी दिल्ली** : मणिपूरच्या मुद्द्यावरून विरोधकांकडून केंद्र सरकारच्या विरोधात अविश्वासाचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. यावर बुधवारी (दि. ९) लोकसभेत चर्चा करण्यात आली. जनतेमध्ये केवळ संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधक करीत असून त्यासाठी हा अविश्वासाचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत म्हटले, तसेच मणिपूरमधील घटना ही लज्ज्ञास्पद आहेच, पण त्यावर राजकारण करणे हे त्याहून लज्ज्ञास्पद असल्याचे अमित शाह यांनी म्हटले. सरकार मणिपूरच्या मुद्द्यावर चर्चा करण्यास तयार आहे, मात्र विरोधक चर्चा होऊ देत नाहीत, असा आरोपही त्यांनी विरोधकांवर केला. मणिपूरच्या प्रकरणावर एक असा समज पसरवला जातो आहे की, आमच्या सरकारला यावर चर्चा नको, मात्र मी या लोकसभेला सांगू इच्छितो मी पत्र लिहून अध्यक्षांना सांगितले होते की, मणिपूरच्या प्रश्नावर चर्चा झाली पाहिजे असेही गृहमंत्री अमित शाह म्हणाले.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २४
www.ramprahar.com

गुरुवार, १० ऑगस्ट २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


नैसर्गिक आपत्तीतील नुकसान भरपाईसाठी अनुदान मंजूर/२

सण, उत्सवांच्या पार्श्वभूमीवर रस्ते दुरुस्तीची कामे वेगात/६

विश्वचषकातील नऊ सामन्यांमध्ये बदल/८


# ...अन्यथा ११ ऑक्टोबरला मंत्रालयावर मोर्चा काढू -दशरथ पाटील

**पनवेल : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा जो ठराव राज्य सरकारने विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर केला आहे, त्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्य सरकारने त्वरित तो केंद्र सरकारकडे पाठवून मंजूर करून घ्यावा याकरीता लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीने बुधवारी (दि.९) विमानतळावर जाण्यासाठी असलेल्या तीन प्रमुख मार्गांवर नामफलक लावल्याचे प्रतिपादन समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी केले. आज क्रांती दिन आहे. त्याचप्रमाणे तुम्ही फार वेळ घेऊ नका; अन्यथा ११ ऑक्टोबर रोजी आम्ही मंत्रालयावर लाँग मार्च काढू, असा इशाराही त्यांनी दिला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी सर्वपक्षीय कृती समितीने केली आहे. त्याबाबत विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात ठराव मंजूर झाला आहे. त्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्य सरकारने तो त्वरित केंद्र सरकारकडे पाठवून मंजूर करून घ्यावा, अशी सर्वपक्षीय कृती समितीची मागणी आहे. त्यामुळेच सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी बुधवारी नवी मुंबई विमानतळावर जाण्यासाठी असलेल्या तरघर, उलवे व चिंचपाडा या तीन प्रमुख मार्गांवर लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नामफलक लावण्यात आले.

या वेळी समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सल्लागार माजी खासदार जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, कार्यकारिणी सदस्य आमदार मंदाताई म्हात्रे, राजू पाटील, माजी आमदार सुभाष भोईर, माजी महापौर कविता चौतमोल, (पान २ वर..)

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या तीन मार्गांवर कृती समितीने झळकवले लोकनेते दि. बा. पाटील नामफलक




“ आजच्या दिवशी गेल्या वर्षी सरकारने नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा जो निर्णय घेतला त्याला विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाने मंजुरी दिली. केंद्र सरकारकडून मंजुरी मिळण्याची उत्कंठा आता सर्व भूमिपुत्रांमध्ये लागून राहिली आहे. ते काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी आज प्रकल्पग्रस्तांच्या वतीने येथे लोकनेते दि. बा. पाटील यांचे नामफलक उभारले जात आहेत. अनधिकृतरित्या फलक लावला असा आरोप करणारे आंदोलनात कधीच सहभागी झाले नव्हते. आज त्यांच्या पाठी जनमत नाही. त्यावेळी स्वप्नरंजनात वावरून ते पत्र लिहीत आहेत. यांचे सरकार असताना कार्यकर्त्यांवर केसेस झाल्या. ज्यांनी भोगले आहे त्यांच्या समोर त्यांनी येऊन बोलावे.

**-आमदार प्रशांत ठाकूर,** कार्याध्यक्ष, सर्वपक्षीय कृती समिती

दि. बा. पाटील कोण होते? असा प्रश्न या विमानतळावर येणाऱ्याला पडेल. यासाठी त्यांच्या भूमिपुत्रांच्या लढ्याची माहिती, किती वेळा ते आमदार, खासदार होते याची माहिती येथे लावणे गरजेचे आहे.

**-आमदार मंदा म्हात्रे,** कार्यकारिणी सदस्य

“



आपले लाडके लोकनेते दि. बा. पाटील ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजाकरिता, दीनदुबळ्यांकरिता खर्च केले त्यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिले जावे ही आपल्या सर्वांची इच्छा आहे. त्याकरिता अनेक वर्ष आपण लढलो. सरकारने प्रत्यक्ष ते जाहीर करावे, अशी अपेक्षा आहे. त्याकरिता आपण लढत आहोत. ते लवकरच होईल याची १०० टक्के खात्री आहे. आज या जागेवर आपण लावलेला फलक काढण्याची कोणाची हिंमत नाही, पण जे कोणी बोलतात ते कधी दोन वर्षांत एकदा तरी आले का? काय चालले हे ऐकायलाही आले नाहीत. ते वाऱ्यावर बोलतात. त्यांची आपल्याला गरज नाही. आपले ध्येय नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देणे हे आहे.

**-लोकनेते रामशेठ ठाकूर,** उपाध्यक्ष, सर्वपक्षीय कृती समिती

### माझी माती, माझा देश अभियानाचा शुभारंभ

# प्रत्येकाच्या मनात स्वदेश, स्वाभिमान, स्वधर्म जागला पाहिजे -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

देशासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या त्याग आणि बलिदानामुळे आजचे स्वातंत्र्याचे अमृतक्षण आपण अनुभवतो आहोत. माझी माती, माझा देश अभियानातून त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करीत आपण हा ऐतिहासिक वारसा जोपासण्याचे काम करीत आहोत. स्वराज्याचा हुंकार या महाराष्ट्राच्या मातीतून उमटला, त्याचा अभिमान प्रत्येकाने बाळगला पाहिजे. त्याचप्रमाणे प्रत्येक नागरिकाच्या मनात स्वदेश, स्वधर्म आणि स्वाभिमान जागवण्याचे काम या अभियानाच्या माध्यमातून होणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

ऑगस्ट क्रांती मैदान येथे केंद्र शासनाच्या आझादी का अमृत महोत्सव सांगतेच्या निमित्ताने माझी माती माझा देशअभियानांतर्गत देशासाठी बलिदान देणाऱ्या वीरांच्या नावाच्या शिलाफलकाचे अनावरण आणि ऑगस्ट क्रांती मैदानातील पुरातन वास्तूजतनाच्या विविध कामांचे लोकार्पण बुधवारी (दि. ९) करण्यात आले. त्या वेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव मनोज सौनिक, आमदार मनीषा कायंदे, आशिष शेलार, यामिनी जाधव, आमदार सदा सरवणकर, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, मुंबई महानगरपालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल आदी या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचा समारोप आपण माझी माती माझा देश या राष्ट्रभक्तीने प्रेरित अशा उपक्रमाने करीत आहोत. प्रत्येक नागरिकाच्या मनात स्वदेश, स्वधर्म आणि स्वाभिमान जागवण्याचे काम या अभियानाच्या माध्यमातून होणार आहे. (पान २ वर..)



९ ऑगस्ट हा स्वातंत्र्यसैनिकांना, शहिदांना नमन करण्याचा दिवस आहे. येत्या काळामध्ये या पंचप्राणच्या माध्यमातून निश्चितपणे आपण नागरिक म्हणून देशाला विकसित करण्याचे स्वप्न पूर्ण करू. ऑगस्ट क्रांती मैदानाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि म्हणून या ठिकाणी उचित व्यवस्था असावी या दृष्टीने महापालिकेने चांगली व्यवस्था केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वामध्ये मुंबई बदलत आहे.

**-देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

देशाच्या स्वातंत्र्यासाठीचे लोकआंदोलन ऑगस्ट क्रांती मैदान येथून सुरू झाले. या स्वातंत्र्यसैनिकांनी, त्यांच्या कुटुंबीयांनी देशासाठी त्याग केला. ही देशभक्ती आणि विकासाची ज्योत तेवत राहील आणि ती पुढील पिढीपर्यंत पोहचवण्याचे काम आपण सर्वांनी केले पाहिजे.

**-अजित पवार, उपमुख्यमंत्री**

## निवडक

### पुण्याच्या चांदणी चौकातील उड्डाणपुलाचे काम पूर्ण

**पुणे** : पुण्यातील चांदणी चौकातील उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले आहे. येत्या शनिवारी (दि. १२) या पुलाचे उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे. पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर हा उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. चांदणी चौकात होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यास या नव्या उड्डाणपुलामुळे मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### म्हाडाच्या ४,०८२ घरांच्या लॉटरीची तारीख ठरली!

**मुंबई** : म्हाडाने काही दिवसांपूर्वी ४०८२ घरांसाठी सोडत काढली होती. ४०८२ घरांसाठी तब्बल एक लाख २० हजार अर्ज दाखल झाले होते. या सर्व ४,०८२ घरांच्या लॉटरीची तारीख अखेर ठरली आहे. १४ ऑगस्टला स. ११.३० वाजता लॉटरी निघणार असल्याची माहिती गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी दिली.

# पुढील एका वर्षात मुंबई-गोवा महामार्ग पूर्ण

## मंत्री उदय सामंत यांनी घेतली शपथ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**



मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचा रखडलेला विकास पूर्ण होण्याच्या दृष्टीने राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी जनभावनांचा आदर करीत महामार्ग एका वर्षात पूर्ण करण्याबाबत शपथ घेतली आहे.

मुंबई -गोवा महामार्गाच्या पूर्णतेसाठी सातत्याने वेगवेगळ्या संस्थांकडून आंदोलन व मागण्या होत आहेत, तसेच कोकणातील पत्रकारांनी बोंबाबोंब आंदोलन करून निषेधाचे दहा हजार संदेश पाठविण्याचे नियोजन केले. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री उदय सामंत यांनी संघटना, पत्रकार व नागरिकांना महामार्गाच्या विकासासाठी स्वतः कटिबद्ध असून पुढील एका वर्षात काम पूर्ण करण्याचे आश्वासन या वेळी दिले.

पालकमंत्री उदय सामंत म्हणाले, मुंबई -गोवा राष्ट्रीय महामार्गाबाबत आंदोलनकर्त्या आपल्या सर्वांच्या भावना व कोकणवासीयांच्या भावना याच माझ्यादेखील भावना आहेत. आपला मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग हा तीन जिल्ह्यात विभागाला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हा महामार्ग पूर्ण मी पालकमंत्री असताना झाला आणि तसाच माझा प्रयत्न माझा रायगड आणि रत्नागिरीसाठी आहे. काही ठेकेदारांच्या तांत्रिक अडचणींमध्ये महामार्ग अडकला आहे. मी स्वतः केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्यासह हा प्रश्न सोडविण्यासाठी बैठका घेतल्या आहेत, तरीही अपयश येतेय याची मला कल्पना आहे, पण मी आपणास शब्द देतो पुढच्या एका वर्षात काहीही करून हा महामार्ग पूर्ण करू, अशी मी खात्री देतो.

तुमच्या भावनांचा आदर करून मी शपथ घेतो की पुढच्या एका वर्षात महामार्ग पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेन, असे पालकमंत्री उदय सामंत यांनी कळविले आहे.

# रायगडात १७ ऑगस्टपासून शाळाबाह्य मुलांची शोधमोहीम

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील तीन ते १८ वयोगटातील शाळाबाह्य, अनियमित आणि स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य मुलांची विशेष शोध मोहीम १७ ऑगस्टपासून हाती घेण्यात येणार असून ही मोहीम ३१ ऑगस्टपर्यंत राबविली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी दिली आहे.



रायगड जिल्ह्यात प्राथमिक समग्र शिक्षा कार्यक्रमाची तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत ज्ञानरचनावादी शाळा, ‘कृतीयुक्त अध्ययन पद्धती, डिजिटल शाळा, आयएसओ मानांकन, मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, मध्यान्ह भोजन, विविध शिष्यवृत्ती शिष्यवृत्ती परीक्षा तयारी, नवोदय परीक्षा तयारी अशा प्रभावी उपक्रमांची अंमलबजावणी अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकांमार्फत शाळांमध्ये सुरू आहे, मात्र शासनाच्या अनेक योजना सुरू असतानाही अद्याप काही बालके शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास येत आहे.

अशा बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणेसाठी शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरिता शोध मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेत घरोघरी जाऊन शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करण्याव्यतिरिक्त बसस्थानक, रेल्वेस्थानक, बाजारपेठ, वीटभट्ट्या, दगडखाणी, साखर कारखाने, स्थलांतरित कुटुंबे, मागास, वंचित, अल्पसंख्याक गटातील वस्त्या, राज्यातील सर्व खेडी, गाव, वाडी, तांडे, पाडे, शेतमळे, जंगल, बालगृह, निरीक्षण गृह, विशेष दत्तक संस्था आदी ठिकाणी जाऊन शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या नोंदी करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

शाळाबाह्य मुलांच्या विशेष शोध मोहिमेंतर्गत तीन ते सहा वयोगटातील जी बालके एकात्मिक बालविकास योजनेचा लाभ घेत नाहीत तसेच खासगी बालवाडी, इंग्रजी माध्यमांचे ज्युनिअर केजी, सिनिअर केजीमध्ये जात नाहीत व सहा ते १८ वर्ष वयोगटातील शाळाबाह्य बालकांची शोधमोहीम घेण्यात येणार आहे.

या कालावधीत नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी केले आहे.

# रायगडातील २५ धरणे १०० टक्के भरली

**रोहे : प्रतिनिधी**

या वर्षी रायगड जिल्ह्यात पावसाळा उशिराने चालू झाला आहे. जुलै महिन्यात चांगला पाऊस पडल्याने जिल्ह्यातील लघु पाटबंधारे विभाग कोलाड अंतर्गत येणाऱ्या २८ धरणांपैकी २५ धरणे १०० टक्के भरली आहेत. उर्वरित तीन धरणेही भरण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यात पाण्याचा मुबलक साठा उपलब्ध झालेला आहे.



जिल्ह्यात समाधानकारक पाऊस पडल्याने चांगला पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. जिल्ह्यातील धरण क्षेत्रामध्ये फणसाड, वावा, सुतारवाडी, आंबेघर, कोंडगाव, घोटवडे, ढोकशेत, कवेळे, उन्हेरे, कुडकी, पाभरे, संदेरी, वरंध, खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे, साळोख, अवसरे, भिलवले, कलोते मोकाशी, डोणवत, मोरबे, बामणोली, उसरण या धरण क्षेत्रात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

श्रीगाव धरण क्षेत्रात ९४ टक्के, रानिवली धरण क्षेत्रात ७३ टक्के पाणीसाठा व पुनाडे धरण क्षेत्रात ८१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

# पनवेलच्या मोरावे राजिप शाळेत वह्यावाटप

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा उपक्रम



(छाया : संकेत भोईर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने तालुक्यातील मोरावे येथील राजिप शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते विद्यार्थांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने तालुक्यातील मोरावे येथील राजिपच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी गव्हाण ग्रामपंचायत उपसरपंच विजय घरत, अमर म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायत सदस्या योगीता भगत, पनवेल कोळी समाज अध्यक्ष उत्तम कोळी, युवा मोर्चा अध्यक्ष निलेश खारकर, भाजप उलवे नोड अध्यक्ष मदन पाटील, उलवे नोड महिला अध्यक्षा निकिता खारकर, समाजिक कार्यकर्ते शैलेश भगत, प्रवीण ठाकूर, हरेश घरत, सुरेश कोळी, मच्छिंद्र कोळी, प्रिया शिंदे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते लहू म्हात्रे, मिनाथ भोईर, वहाळ ग्रामपंचायत सदस्या मंजुळा कोळी, वितेश म्हात्रे, धीरज ओवळेकर, विनायक कोळी, मयेकर मॅडम, नांदगावकर सर, प्रणय कोळी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# ज्येष्ठ लेखक, विचारवंत प्रा. हरी नरके यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ लेखक, विचारवंत आणि समता परिषदेचे उपाध्यक्ष प्रा. हरी नरके यांचे निधन झाले आहे. एशियन हार्ट हॉस्पिटलमध्ये बुधवारी (दि. ९) वयाच्या ६०व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

समता परिषदेच्या गुरुवारी मुंबईत होणाऱ्या बैठकीसाठी हरी नरके पुण्याहून मुंबईला येत होते. येताना पहाटे त्यांना उलट्यांचा त्रास होऊ लागला. त्यामुळे बीकेसीच्या एशियन हार्ट रुग्णालयात दाखल करण्यात आलं आणि त्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाला. हरी नरके यांच्या निधनाने समाज एका पुरोगामी चळवळीला मुकला आहे. फुले व आंबेडकर यांच्या विचारांची व कार्याची प्रस्तुतता अधिक चांगल्या प्रकारे अधोरिखित करणे आणि शासकीय पातळीवर वेगाने निर्णय घडून आणण्यामध्ये हरी नरके यांचा मोलाचा वाटा आहे.



महाराष्ट्र शासनाने समग्र महात्मा फुले हा एक हजार पानाचा ग्रंथ अद्ययावत करून प्रकाशित केला, त्याचे संपादक हरी नरके होते. डॉ. आंबेडकरांच्या समग्र वाङ्मयाचे राज्य शासनाने २६ खंड प्रकाशित केले, त्यातील सहा खंडांचे संपादनही त्यांनी केले होते. त्यांची महात्मा फुले यांची बदनामी : एक सत्यशोधन आणि महात्मा फुले-शोधाच्या नव्या वाटा ही दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

# आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध –मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**पालघर : प्रतिनिधी**

जल, जंगल, जमिनीचे रक्षण करीत पर्यावरण जपणाऱ्या आदिवासी बांधवांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून शासनातर्फे अनेक योजना राबविण्यात येत आहेत. असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी क्रांतीवीर बिरसा मुंडा यांना नमन करून जागतिक आदिवासी दिनाच्या सर्व आदिवासी बांधवांना शुभेच्छा दिल्या.



पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील राजीव गांधी मैदान येथे बुधवारी (दि. ९) जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी विकास विभागामार्फत राज्यस्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात ते दूरदृष्यप्रणालीमार्फत बोलत होते.


या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार हे दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते, तर आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, कुमुद गावित, पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार राजेंद्र गावित, आमदार शांताराम मोरे, श्रीनिवास वनगा, आदिवासी विकास विभागाचे अपर मुख्य सचिव प्रदीप कुमार व्यास, माजी आमदार रवींद्र फाटक, आदिवासी विकास आयुक्त नैना गुंडे, राज्यस्तरीय आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडीत, पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडके, अपर आयुक्त आदिवासी विकास बाळासाहेब पाटील, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, डहाणू प्रकल्प अधिकारी संजीता महापात्रा, जव्हार प्रकल्प अधिकारी नेहा भोसले, अप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब फटांगरे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, आदिवासींची प्राकृतिक परंपरा जपणारी जीवनशैली आहे. देशाचा गौरव जपण्यात आदिवासींचे काम अविस्मरणीय आहे, असे गौरवोद्गार काढून भगवान बिरसा मुंडा यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचाही गौरवपूर्ण उल्लेख केला. देशाच्या अर्थसंकल्पात आदिवासींसाठी पाचपट आर्थिक तरतूद वाढविली असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, आदिवासी बांधवांना मुख्यप्रवाहात आणण्यासाठी आवश्यक असलेला निधी तातडीने वितरीत केला जाईल. आदिवासींच्या विकासाचा रथ पुढे नेण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

पालकमंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले की, आदिवासी पाडे हे मुख्य रस्त्यांना जोडणे आवश्यक आहे. या कामाला प्राधान्य देणार असल्याची माहिती दिली. जिल्ह्यात ५६१ विकासकामे सुरू असून ८० अमृतसरोवर तयार होत असल्याचेही ना. चव्हाण यांनी सांगितले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी, आदिवासींच्या पाड्यांना जोडणारे रस्ते, त्यांच्यासाठी घरे, शिक्षणाच्या सुविधा, धान खरेदी, दाखले वितरण या सर्व योजना पारदर्शकपणे राबवून आदिवासींना जास्तीत जास्त लाभ देणार असल्याची ग्वाही दिली. या कार्यक्रमामध्ये विविध शासकीय योजनांचा मान्यवरांच्या हस्ते लाभ वाटप कार्यक्रम व विविध क्षेत्रात उल्लेखनिय काम करणाऱ्या आदिवासी बांधवांचा गुणगौरव करण्यात आला. या वेळी ४० प्रकारचे पारंपरिक नृत्य प्रकार सादर करण्यात आले.

## नैसर्गिक आपत्तीतील नुकसान भरपाईसाठी अनुदान मंजूर



### रायगडातील ६६२३ बाधितांना मिळणार मदत

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात जुलै महिन्यात अतिवृष्टीचा पावसाने झालेल्या नुकसानीसाठी नागरिकांना मदत देण्याचा सूचना देण्यात आल्या. जिल्ह्यातील ५,५९४ पात्र नागरिकांना जवळपास ५४ लक्ष रुपये अर्थिक मदतीचे वाटप केले जाणार आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहे.

या अंतर्गत अनुदान संबंधित तालुक्याचे तहसीलदार यांना वर्ग करण्यात आले असून यामध्ये निवारा केंद्रात स्थलांतरित केलेल्या पाच हजार ९६ नागरिकांसाठी २९ लाख २४ हजार रुपये अनुदान मंजूर करण्यात आले आहे. याचबरोबर ४५२ घरांच्या पुनर्बांधणीसाठी सात लक्ष ९८ हजार रुपये मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाईसाठी १५ लक्ष ८३ हजार रुपये अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

राज्यात १९ ते २३ जुलै या कालावधीत अनेक जिल्ह्यात अतिवृष्टी व पूर यामुळे मोठे नुकसान झाले होते. बाधित झालेल्या नागरिकांना मदत देण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित झाला आहे. यामध्ये काही बाबींवर विशेष दराने वाढीव मदत देण्याचादेखील सूचना शासनाने केल्या आहेत.

प्रामुख्याने पूर व अतिवृष्टीमुळे घरे वाहून जाणे पूर्णपणे क्षतिग्रस्त होणे अथवा दोन दिवसांपेक्षा अधिक काळ घरे व शेत्र पाण्यात बुडाल्याने नागरिकांचे मोठे नुकसान होते. यासाठी पूर्वीच्या दरानुसार वाढ करण्यात आले असून दहा हजार रुपये मदत शासनाकडून देण्यात येणार आहे. याचबरोबर दुकानदार अथवा टपरीधारक आदींना नैसर्गिक आपत्तीमुळे मदत देण्यासाठी कोणतीही तरतूद राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमध्ये करण्यात आले नव्हते त्याचादेखील समावेश करण्यात आला आहे.

यासाठीचे वारस पंचनामे, वारस संमतीपत्र आदींची कार्यवाही सुरुवात करण्यात आली असून निवारा केंद्र व तात्पुरते स्थलांतर झालेल्या ठिकाणी सोयीसुविधांसाठी या अनुदानातील खर्च करण्यात आले आहेत, अशी माहिती देण्यात आली आहे.

## यशोधन कल्याणकारी संस्थेतर्फे वृक्षारोपण

**सांगली : प्रतिनिधी**

तालुक्यातील विटा येथील यशोधन बहुउद्देशिय कल्याणकारी संस्थेच्या वतीने वृक्षारोपण करण्याचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष तथा मनमंदिर सहकारी नागरी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन भूपेंद्र बाबुराव बारसिंग यांच्या हस्ते प्रथम वृक्षलागवड करण्यात आली. या



उपक्रमावेळी दत्तात्रय बारसिंग, शशिकांत बारसिंग, महादेव बारसिंग, तुकाराम झेडे, कुंडलिक बारसिंग सिद्धार्थ बारसिंग, शामराव बारसिंग आदी उपस्थित होते.

यशोधन भूपेंद्र बारसिंग सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणारे असे व्यक्तिमत्व आहे. आरोग्य शिबिर, छत्रीवाटप, महिला बचत गटासाठी विविध उपक्रम, स्वच्छता अभियान, महापुरुषांची जयंती असे अनेक कार्यक्रम या संस्थेच्या वतीने अध्यक्ष भूपेंद्र बारसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली नेहमीच राबविण्यात येतात.

## महापारेषणमध्ये ‘पंचप्राण शपथ’

**मुंबई :** केंद्र सरकारच्या सूचनेनुसार राज्यात ‘मेरी माटी, मेरा देश’ अर्थात ‘माझी माती, माझा देश’ अभियानांतर्गत महापारेषणमध्ये बुधवारी (दि. ९) महापारेषणच्या सांघिक कार्यालय व राज्यातील ठिकठिकाणच्या कार्यालयात पंचप्राण शपथ घेण्यात आली.

वांद्रे येथील प्रकाशगंगा इमारतीत महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे यांनी महापारेषणच्या महाराष्ट्रातील ठिकठिकाणच्या कार्यालयात मुख्य अभियंता यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना पंचप्राण शपथ दिली. या वेळी मुख्य महाव्यवस्थापक सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता पीयूष शर्मा, महाव्यवस्थापक अंजू गुप्ता, राजू गायकवाड, अधीक्षक अभियंता त्र्यंबक ढेंगळे, संजीवकुमार बड्डेला, सचिन खडगी, सहायक महाव्यवस्थापक महेश सावंत, इमाम सिद्दीकी, महेश आंबेकर आदी उपस्थित होते.

## माजी सैनिकांबद्दल समाजाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा –युद्धवीर प्रकाश महाडिक

**खोपोली : प्रतिनिधी**

देशाच्या रक्षणासाठी बलिदान देणाऱ्या शहीद जवानांच्या कुटुंबीयांबद्दल त्याचप्रमाणे माजी सैनिकांबद्दल समाजाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याची गरज असल्याचे युद्धवीर तसेच माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश महाडिक यांनी खोपोली येथे प्रतिपादन केले.

९ ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधत भाजप खोपोली मंडळातर्फे मेरी मिट्टी मेरा देश, मिट्टी को नमन वीरो को बंधन या कार्यक्रमाचे आयोजन वरची खोपोली येथील ऐतिहासिक वीरेश्वर मंदिराच्या प्रांगणात करण्यात आले होते, त्या वेळी ते बोलत होते.



या वेळी व्यासपीठावर भाजप रायगड जिल्हा महिला मोर्चा अध्यक्ष अश्विनी पाटील, जिल्हा उपाध्यक्ष श्रीकांत पुरी, शहर महिला अध्यक्ष शोभा काटे, सरचिटणीस अश्विनी अत्रे, शहराध्यक्ष रमेश रेटरेकर, सरचिटणीस हेमंत नांदे, युवा मोर्चा अध्यक्ष अजय इंगुलकर आदी उपस्थित होते.

आपल्या भाषणात प्रकाश महाडिक यांनी, पंतप्रधान मोदी यांनी सैनिकांबद्दल घेतलेल्या भूमिकेबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी १९७१मधील पाकिस्तान बरोबर झालेल्या युद्धातील काही प्रसंग शब्दांतून जिवंत केले. यानंतर हवाई दलातील निवृत्त सैनिक रमाकांत मोदी यांनीही युद्धातील प्रसंग शब्दातून उभा केला.

महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांनी, सैनिकांबद्दल समस्त समाजाने सकारात्मक दृष्टिकोन बाळगण्याची गरज असल्याचे सांगताना, केंद्रातील भाजप सरकारने सैन्य दलातील सैनिकांसाठी तसेच माजी सैनिकांबद्दलही चांगली भूमिका घेतल्याचे सांगितले. देशाच्या रक्षण करणाऱ्या सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांबद्दल भारतवासीयांनी संवेदनशील असण्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. मान्यवरांच्या हस्ते माजी सैनिक प्रकाश महाडिक, रमाकांत मोदी, प्रवीण सावंत, संजय वाघमारे, उल्हास लाडे, प्रकाश उत्तेकर, जयेश कदम, भरत काकडे, तसेच वीरमाता व वीर पत्नी यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात पंचप्राण शपथ उपस्थितांना देण्यात आली. खोपोली मंडळ अध्यक्ष रमेश लेटरेकर यांनी प्रकाश महाडिक यांनी मांडलेल्या सूचनांचा आदर करीत पक्षातर्फे माजी सैनिक व कुटुंब यांना फुल ना फुलाची पाकळी देण्याबद्दल प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाला सरचिटणीस प्रमोद पिंगळे, गीता मोहिते, माजी अध्यक्ष इंधर्मल खंडेलवाल, दिलीप पवार, देवेंद्र पाटील, वामन दिघे, राकेश दबके, सुनील नांदे, सुधाकर दळवी, राहुल जाधव, गोपाळ बावस्कर, रसिका शेटे, स्नेहल सावंत, निशा दळवी, डॉ. अश्विनी सावरीकर, सुप्रिया नांदे, विमल गुप्ते, सीमा मोगरे, रक्षा माळोदे, संजय कचरे, हेमंत भाटिया, प्रल्हाद अत्रे, सुरेन जाधव, कीर्ती ओसवाल, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी घेतली पंचप्राण शपथ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या समारोपनिमित्त संपूर्ण देशभर ‘माझी माती माझा देश’ हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत बुधवारी (दि.९) रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील येणाऱ्या सर्व शासकीय कार्यालयांमध्ये पंचप्राण शपथ घेण्यात आली.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या समारोप उपक्रमांतर्गत माझी माती माझा देश अभियान राबविण्यात येत असून या उपक्रमानुसार गाव ते शहरांपर्यंत आपल्या मातीविषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी, हा या



अभियानाचा उद्देश आहे. या अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या पंचप्राण शपथ कार्यक्रमात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले होते.

रायगड जिल्हा परिषदेच्या विविध विभागांसह, पंचायत समिती, ग्रामपंचायत स्तरावर बुधवारी पंचप्राण शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, नागरिक यांनी एकत्रित येत, आम्ही शपथ घेतो की, भारतास २०४७ पर्यंत आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न साकार करू, गुलामीची मानसिकता मुळापासून नष्ट करू, देशाच्या समृद्ध वारशाचा गौरव करू, भारताची एकात्मता बलशाली करू आणि देशाचे संरक्षण करणाऱ्यांप्रति सन्मान बाळगू, देशाचे नागरिक म्हणून सर्व कर्तव्यांचे पालन करू, अशी पंचप्राण शपथ घेतली.

## पान १ वरून

### ...अन्यथा ११ ऑक्टोबरला मंत्रालयावर मोर्चा काढू –दशरथ पाटील

माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, माजी उपमहापौर चारुशीला घरत, भाजप महिला तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, जे. डी. तांडेल, अतुल पाटील, विनोद म्हात्रे, संतोष केणे, गजानन पाटील, राजेश गायकर, विजय गायकर, दीपक पाटील, शैलेश घाग, प्रताप पाटील, नितेश वैती, रघुनाथ पाटील, सुभाष पाटील, मधुकर पाटील, प्रकाश पाटील, रवींद्र वाडकर, गुलाब वझे, पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक विजय चिपळेकर, विकास घरत, संतोष भोईर, गोपीनाथ भगत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजेश्री वावेकर, रूचिता लोंढे, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

बुधवारी सकाळी प्रथम तरघर येथे नंतर उलवे व चिंचपाडा येथे नामफलक लावण्यात आले. या वेळी समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी, राज्य सरकारचा या नावाला विरोध नाही. त्यामुळे दोन्ही विधिमंडळात ठराव मंजूर करण्यात आला आहे तो केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी लवकर पाठवावा, अशी आमची मागणी आहे.

त्यासाठी आम्ही मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यांनी यासाठी पालकमंत्री उदय सामंत यांना पाठपुरावा करण्याची जबाबदारी दिली आहे. त्यामुळे आता लवकरच त्याला मान्यता मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

### प्रत्येकाच्या मनात स्वदेश, स्वाभिमान स्वधर्म जागला पाहिजे –मुख्यमंत्री

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या या मंत्राचा जागर आजच्या काळात आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. ऑगस्ट क्रांती मैदानाच्या ऐतिहासिक आठवणी, घटना आहेत ते जपण्याचे काम मुंबई महापालिकेने केले असल्याचे सांगून राज्यातही सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, विविध यंत्रणा या सर्वांच्या समन्वयाने हे अभियान यशस्वी होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व इतर मान्यवरांनी ऑगस्ट क्रांतीस्तंभाला अभिवादन केले. त्यानंतर देशासाठी बलिदान देणाऱ्या वीरांच्या नावांची नोंद असलेल्या शिलाफलकाचे अनावरण आणि वसुधा वंदन अंतर्गत वृक्षारोपणही करण्यात आले, तसेच राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांच्या मॅरेथॉन रॅलीला या वेळी मान्यवरांनी हिरवा झेंडा दाखवला.

## पनवेल मनपाच्या कर पुनर्निरीक्षण प्रभागनिहाय मोहिमेला नागरिकांचा प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या वतीने मालमत्ता कर विभागामार्फत ७ व ८ ऑगस्ट या कालावधीत प्रभाग समिती अ, कार्यालयांमध्ये कर देयके सुधारणा विशेष पुनर्निरीक्षण मोहीम राबविण्यात आली. नागरिकांचा या प्रभागनिहाय मोहिमेस चांगला प्रतिसाद मिळाला. या मोहिमेदरम्यान सुमारे २०७ अर्ज नागरिकांनी दाखल केले.

पनवेल महापालिकेच्या वतीने मालमत्ता कर विभागामार्फत दिनांक २४ जुलै ते ४ ऑगस्ट या कालावधीत आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी १०:३० ते ०१:३० या वेळेत कर पुनर्निरीक्षण मोहीम राबविण्यात आली होती. नागरिकांचा या मोहिमेला मोठा प्रतिसाद लाभल्यानंतर आयुक्त गणेश देशमुख यांनी लोकाग्रहास्तव या मोहिमेस मुदतवाढ दिली आहे. नागरिकांना सोयीचे व्हावे या उद्देशाने ही मोहिम प्रभाग निहाय घेण्यास सुरूवात करण्यात आली आहे. त्यानुसार नागरिकांच्या मालमत्ता कराबाबत त्रुटींचे निवारण करण्यासाठी ७ व ८ ऑगस्ट रोजी



खारघर प्रभाग कार्यालयात कर पुर्न निरीक्षण मोहिम राबविण्यात आली. प्रभाग अ नंतर प्रभाग समिती ब कार्यालय, कळंबोली येथे ९ व १० ऑगस्ट, प्रभाग समिती क कार्यालय, कामोठे ११ व १२ ऑगस्ट व प्रभाग समिती ड कार्यालय, पनवेल १७ व १८ ऑगस्ट या दिवशी त्या त्या प्रभागांमध्ये सकाळी १०.३० ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत कर पुर्न निरीक्षण मोहीम राबविली जाणार असल्याची माहिती मालमत्ता कर विभाग उपायुक्त गणेश शेटे यांनी दिली आहे.

या मोहिमेमध्ये नागरिकांच्या किरकोळ तक्रारी तत्काळ सोडविल्या जात आहे. महापालिकेने एप्रिल महिन्यापासून ते आजपर्यंत १७० कोटीहून अधिक वसुली केली आहे, मालमत्ताधारकांना मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी महापालिकेने ‘PMC TAX APP’ मोबाईल ॲप विकसित केले आहे, तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवरही नागरिकांना कर भरता येणार आहे, तसेच मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास त्यांनी १८००२२७७०१ या टोल फ्री क्रमांकावरती संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कर्ज योजनेंतर्गत लाभासाठी अर्ज करावेत

**अलिबाग** : शासनाच्या सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागांतर्गत अनुसूचित जातीतील बांधवांसाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे थेट कर्ज योजनेंतर्गत लाभ घेण्यास इच्छूक असणाऱ्या अर्जदारांनी १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबरदरम्यान जिल्हा कार्यालय अलिबाग, श्रीराम समर्थ गृहनिर्माण संस्था मर्या, सदनिका क्र.२ तळमजला, मारुती मंदिराच्या मागे, चेंढरे या पत्त्यावर अर्ज देणे, तसेच मूळ दस्तऐवजासह स्वतः साक्षांकित करून कर्ज प्रस्ताव स्विकारण्यात येतील, असे कळविले आहे.

## दुखवटा

### हिरा साठे



**पनवेल** : गुळसुंदे येथील हिरा दत्तात्रेय साठे यांचे वयाच्या ७१ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, तीन मुली असा परिवार आहे. प्रेमळ स्वभाव राहिलेल्या हिरा साठे यांना आदराने ’हिराताई’ या नावाने ओळखले जात होते. त्यांच्या अंत्ययात्रेस सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थ व नातेवाईक उपस्थित होते. हिराताई यांचा दशक्रिया विधी १७ ऑगस्टला श्री क्षेत्र गुळसुंदे येथे तर उत्तरकार्य गुळसुंदे येथे राहत्या घरी २० ऑगस्ट रोजी होणार आहे.

### राजेश जाधव



**कर्जत** : तालुक्यातील उकरुळ गावचे रहिवासी असलेले राजेश काळूराम जाधव यांचे वयाच्या ४८व्या वर्षी निधन झाले. महाराष्ट्र राज्य शिक्षक समितीचे रायगड जिल्हा अध्यक्ष म्हणून जबाबदारी ते पार पाडत होते. सोमवारी मध्यरात्री त्यांच्या छातीत दुखू लागले आणि त्यानंतर ते स्वतःच रुग्णालयात पोहचले, मात्र उपचार सुरू असताना त्यांचे निधन झाले. त्यांचे पार्थिव त्यांच्या मूळ गावी रात्रीच उकरुळ येथे आणण्यात आले. मंगळवारी सकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# दोन सराईत गुन्हेगारांना अटक

## पनवेल, नवी मुंबई, मुंबई परिसरातील १८ गुन्हे उघड



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल, नवी मुंबई व मुंबई परिसरात घरफोडी चोरी करणारे दोन सराईत गुन्हेगार मानपाडा पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून तब्बल २० लाख रुपयांचा मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

मानपाडा पोलीस ठाणे हददीत घरफोडी चोरीचे गुन्हे घडत असल्याने मानपाडा पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुरेश मदने यांच्या मार्गदर्शनाखालील पोलीस पथकाने आरोपी येण्या जाण्याचे मार्गावरील सीसीटिव्ही फुटेज व इतर तांत्रिक तपास केला. तसेच गोपनिय बातमीदाराच्या आधारे सराईत गुन्हेगार युसुफ रशिद शेख (वय ३८, रा. घणसोली) आणि नौशाद मुस्ताक आलम उर्फ सागर (वय २८, रा.कामोठे) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्ह्यासह पनवेल, नवी मुंबई व मुंबई परिसरात केलेल्या १८ घरफोडीचे गुन्ह्यांची कबुली दिली. आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन यापुर्वी त्यांच्यावर पनवेल, कामोठे, तळोजा यांच्यासह नवी मुंबई व मुंबई मधील विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

### *२० लाख १५ हजाराचा मुद्देमाल हस्तगत*

*मानपाडा पोलिसांनी त्यांच्या कडून २०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, दोन लाख २० हजार ५०० रूपये रोख रक्कम, दोन मोटारसायकल, दोन लॅपटॉप, आठ मोबाईल, पाच मनगटी घडयाळ, एक कॅमेरा, एक स्पिकर, एक एटीएम कार्ड, एक नंबर प्लेट, एक हेल्मेट, घडफोडी करण्याकरीता वापरलेले दोन लोखंडी कटावणी, स्क्रू ड्रायव्हर, पकड, व चाकू असा एकुण २० लाख १५ हजाराचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.*

मानपाडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक अविनाश वणवे, प्रशांत आंधळे, सहाय्यक उपनिरी भानुदास काटकर, हवालदार सुनील पवार, संजु मासाळ, विकास माळी, शिरीष पाटील, राजेंद्र खिलारे, दीपक गडगे, सोमनाथ ठिकेकर, नाईक गणेश भोईर, शांताराम कसबे, प्रवीण किनरे, देवा पवार, येलप्पा पाटील, अनिल घुगे, शिपाई विजय आव्हाड, अशोक आहेर, महेंद्र मंजा, संदीप चौधर यांच्या पथकांने दोन सराईत गुन्हेगारांना अटक केली आहे.

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

# पनवेलमध्येही पंचप्राण प्रतिज्ञा कार्यक्रम

## ‘माझी माती माझा देश’ उपक्रम उत्साहात

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात बुधवारी (दि. ९) ‘माझी माती माझा देश’ उपक्रमांतर्गत पंचप्राण प्रतिज्ञा कार्यक्रम आयुक्त गणेश देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आला. यामध्ये १० हजाराहून अधिक नागरिकांनी या कार्यक्रमांत सहभाग नोंदविला

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी कार्यक्रमाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने विविध कार्यक्रम हाती घेतले होते. या अमृत महोत्सव कार्यक्रमाच्या समारोपानिमित्ताने संपूर्ण राज्यात व देशात ‘मेरी मिट्टी मेरा देश’ अर्थात ‘माझी माती माझा देश’ अभियान राबविले जात आहे. पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात बुधवारी या अभियानांतर्गत महापालिका मुख्यालय, सर्व शाळा, मनपाचे सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरातील मॉल, गर्दीची ठिकाणे, २२ स्वच्छता दुत हजेरी बुथ, शासकिय कार्यालये अशा सर्व ठिकाणी पंचप्रण शपथ घेण्यात आली. या वेळी सुमारे १० हजाराहून अधिक नागरिकांनी या कार्यक्रमांत सहभाग नोंदविला.

‘माझी माती माझा देश’ अभियानांतर्गत पंचप्रण शपथ घेताना सर्वांच्या हातामध्ये मातीचे दिवे देण्यासाठी महापालिकेच्यावतीने विशेष नियोजन करण्यात आले होते.

मनपा मुख्यालयामध्ये, मॉल, पालिका कार्यक्षेत्रातील सर्व शाळा, मनपाच्या नऊ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच प्रभाग कार्यालये, स्वच्छता दुत हजेरी बुथ अशा सर्व ठिकाणी सुमारे १० हजाराहून अधिक मातीच्या दिव्याचा पुरवठा करण्यात आला होता. मोठ्या उत्साहात सुमारे १० हजार



नागरिकांनी हातामध्ये मातीचे दिवे घेऊन ही पंचप्राण प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमानंतर केंद्र शासनाच्यावतीने देण्यात आलेल्या लिंकवरती मोठ्या प्रमाणात नागरिकांनी सेल्फी डाऊनलोड केल्या.

‘माझी माती माझा देश’ अभियानांतर्गत पंचप्रण शपथ कार्यक्रम मनपा कार्यक्षेत्रातील सर्वशाळांनी राबवावा यासाठी आयुक्त गणेश देशमुख यांनी पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील सुमारे १०० हून अधिक शाळांच्या प्रतिनीधीची ८ ऑगस्ट रोजी ऑनलाईन पध्दतीने बैठक घेतली होती. त्यामुळे जवळपास १५० शाळांमधील ५० हजाराहून विद्यार्थ्यांनी मोठ्या जोशपुर्ण वातावरणात मातीचे दिवे हातात घेऊन पंच प्रण प्रतिज्ञा घेतली.

दुसऱ्या कार्यक्रमामध्ये दिनांक ११ ऑगस्ट रोजी शुक्रवारी लोकनेते दि. बा. पाटील शाळेमध्ये ध्वजारोहण करण्यात येणार आहे. याचदिवशी स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाची तमा न बाळगता शहीद झालेल्या स्वातंत्र सैनिक आणि वीरांचा नामोल्लेख असणारा शिलाफलक लोकनेते दि. बा. पाटील शाळेमध्ये उभारण्यात येणार आहे. तसेच चौथ्या कार्यक्रमामध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महात्सवाचे औचित्य साधून लोकनेते दि. बा. पाटील शाळेमध्ये ‘वसुधा वंदन’ अर्थात ७५ देशी वृक्षरोपांची लागवड करून ‘अमृत वाटिका’ तयार केली जाणार आहे.

पाचव्या कार्यक्रमांतर्गत दिनांक ११ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या शहीद वीरांना वंदन करून त्यांच्या परिवारातील सदस्यांचा सन्मान आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात येणार आहे.

### *विविध उपक्रमांचे आयोजन*

*या अभियानांतर्गत शासन निर्देशानुसार ९ ते १४ ऑगस्ट २०२३ या कालावधीत विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांतर्गत पनवेल महापालिका पाच विविध कार्यक्रम करणार आहे. त्यामधील आजचा पहिला कार्यक्रम होता.*

# आरोग्य शिबिर, ताण व्यवस्थापनावर व्याख्यान

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अपोलो हॉस्पिटल सीबीडी बेलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. ९) ताण व्यवस्थापनावर व्याख्यान व आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.

या उपक्रमांसाठी अपोलो हॉस्पिटलचे सर्व डॉक्टर्स यांनी उपस्थित राहून विद्यार्थी व विद्यार्थीनीना तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ताण व्यवस्थापनावर मोलाचे मार्गदर्शन व आरोग्य शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेगवेगळ्या आरोग्याच्या विनामूल्य चाचण्या घेणात आल्या त्यामध्ये प्रामुख्याने रक्तदाब, कॅल्शियम, वेट, फॅट, बॉडी वॉटर व मसल मास यांचा समावेश होता. या





उपक्रमांचा लाभ १०० विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मच्याऱ्यांनी घेतला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व व्याख्यानासाठी तसेच आरोग्य शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमांचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर (समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग) यांनी केले तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व कार्यक्रम अधिकाऱ्यांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन प्रा. राहुल कांबळे यांनी केले तसेच आभार मानले.

# सीकेटी विद्यालयात इन्वेस्टिचर समारंभ उत्साहात

## अर्चना ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागामध्ये बुधवारी (दि. ९) इन्वेस्टिचर समारोह, ऑगस्ट क्रांती दिन व आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रमाची सांगता हे कार्यक्रम एकत्रितपणे झाले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून सीकेटी विद्यालयाच्या शाळा समितीच्या सदस्य अर्चना परेश ठाकूर उपस्थित होत्या.

इन्वेस्टिचर समारोह कार्यक्रमांतर्गत विद्यालयाचे हेड बॉय व हेड गर्ल तसेच ब्ल्यू, ग्रीन, रेड व यल्लो हाऊसच कप्तान, उपकप्तान, मंत्री तसेच यांना मान्यवरांच्या हस्ते बॅचेस देण्यात आले. तसेच मान्यवरांच्या उपस्थित हेड बॉय शुभम सडेकर याने सर्व हाऊसच्या पदाधिकाऱ्यांना शपथ दिली.

अर्चना परेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी इंग्रजी माध्यमाचे प्रमुख संतोष चव्हाण यांचे विशेष कौतुक केले. इंग्रजी माध्यम विविध कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी आयोजित करून आपल्या यशाचा आलेख उंचावत आहे, असे गौरोद्गार त्यांनी काढले. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न करत असतात, असेही प्रतिपादन त्यांनी केले.

या समारंभामध्ये शाळेची माजी विद्यार्थिनी अपूर्वा म्हात्रे, राष्ट्रीय स्थळ रायफल शूटर ही सुद्धा विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होती. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अपूर्वाने आपल्या शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. शाळेने केलेल्या सहकार्याबद्दल ती नेहमीच शाळेची ऋणी राहील असे उद्गार काढले.

या कार्यक्रमांतर्गत ९ ऑगस्ट हा दिवस ‘क्रांती दिन’ म्हणून हुतात्म्यांचे स्मरण करून साजरा केला. तसेच आजादी का अमृत महोत्सव या उपक्रमांच्या समारोह अंतर्गत या कार्यक्रमाचे सुरुवात राष्ट्रगीताने करून हातामध्ये दिवा घेऊन पंचप्राण शपथ घेण्यात आली.

कार्यक्रमास विद्यालयाचे प्रमुख संतोष चव्हाण, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, प्राथमिक विभागाच्या मुख्यधापिका नीलिमा शिंदे, पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी तसेच पालक शिक्षक संघाचे उपध्याक्ष सरला चौधरी, सहसचिव स्मिता भालेकर आदी उपस्थित होते.

# ‘आई तुझ देऊळ’ फेम सचिन ठाकूर यांची कार पुन्हा जाळली

**उरण : बातमीदार**

आई तुझ देऊळ या गीताचे प्रसिद्ध कलाकार, डान्सर / नृत्य दिर्ग्दर्शक, श्री रत्नेश्वरी कलामंचचे संचालक, रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील जसखार गावचे सुपुत्र राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त सचिन लहू ठाकूर यांची चारचाकी गाडीला पुन्हा एकदा आग लावल्याची घटना घडली आहे.



५ जानेवारी २०२३ रोजी जसखार गावात रूम नंबर ४९३, रोड जवळ, जसखार येथे उभी असलेली फोर व्हीलर वाहन मारुती सुझूकी सिलेरियो, कार नंबर एमएच ४६ बीव्ही २२६६ हे वाहन अज्ञात व्यक्तीने जाळले आहे. या वेळी या वाहनाचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले होते तेव्हा सचिन ठाकूर यांनी त्वरित न्हावा शेवा पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा नोंदविला होता, मात्र पोलीस प्रशासनाला तो आरोपी पकडण्यात त्यावेळी अपयश आले. त्यानंतर जवळ जवळ सात महिन्यांनी परत तशीच सेम घटना जसखार गावातील सचिन ठाकूर यांच्या सोबत घडली असून ७ ऑगस्ट २०२३ रोजी रात्री १ वाजून २० मिनिटांनी सचिन ठाकूर यांची रूम ४९३, जसखार गाव येथे असलेले मारुती सुझुकी सेलेरियो कार मागच्या वेळी ज्या पद्धतीने जाळली त्याच पद्धतीने पुन्हा जाळली. वाहनाला लागलेली आग सचिन ठाकूर व त्यांच्या कुटुंबियांनी तसेच मित्रांनी लगेच विझविली. व पुढे होणारा मोठा अनर्थ टळला.

> **घडलेल्या घटनास्थळी जाऊन झालेल्या नुकसानीचे पाहणी करून सदर अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल केला आहे. लवकरच विविध पुराव्याच्या साहाय्याने आरोपीला पकडण्याचे प्रयत्न सुरु आहेत. सदर घटनेचा तपास शीघ्र गतीने आम्ही करीत आहोत.**
>
> **-बबन सोनावणे, पोलीस उपनिरीक्षक, न्हावा शेवा पोलीस ठाणे**

# रामशेठ ठाकूर ज्युनियर कॉलेजमध्ये क्रांती दिन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवारी (दि. ९) क्रांती दिन साजरा करण्यात आला.

मेरी माटी, मेरा देश या अभियानांतर्गत आपल्या वीर जवानांच्या बलिदानाच्या योगदानाची आठवण व्हावी म्हणून पंचप्रण प्रतिज्ञा, वीरों को वंदन, वसुधा वंदन आदी कार्यक्रम उपयोजिले होते. त्या निमित्ताने रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेजमध्ये पंचप्रण प्रतिज्ञेचे आयोजन करण्यात आले होते. पंचप्रण प्रतिज्ञेची शपथ घेताना विद्यार्थ्यांनी आपल्या मातृभूमी प्रित्यर्थ मातीचा दिवा हातात घेतला.

क्रांती दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या



स्पर्धेसाठी देशभक्तीपर गाणी हा विषय देण्यात आला होता. मोठया संख्येने विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.

या कार्यक्रमास प्राचार्या निषा नायर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम व्यवस्थित होण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर, कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# वैद्यकीय शिबिराला ७०२ नागरिकांचा प्रतिसाद

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

ओएनजीसी उरण प्लांटतर्फे नागाव ग्रामपंचायत, उरण येथे बुधवारी (दि. ९) वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ओएनजीसी उरणचे ईडी-प्लांट मॅनेजर सुभोजित बोस यांनी वैद्यकीय शिबिराचे उद्घाटन केले. या वेळी जिल्हा आरोग्य कार्यालय रायगडचे प्रतिनिधी डॉ. राज चव्हाण आणि डॉ. एलिस जयकर, हार्ट फाउंडेशनचे प्रतिनिधी उपस्थित होते.



या शिबिराला सल्ला देण्यासाठी आलेल्या तज्ञ/डॉक्टरांनी अपोलो हॉस्पिटल आणि फोर्टिस हॉस्पिटल, नवी मुंबई या नामांकित हॉस्पिटलमधील नेत्ररोगतज्ज्ञ, पल्मोनोलॉजिस्ट आणि फिजिशियन तसेच तालुका आरोग्य अधिकारी, उरण यांच्या नेतृत्वाखालील सरकारी डॉक्टरांच्या टीमचा समावेश होता. या शिबिराचा आजूबाजूच्या परिसरातील सुमारे ७०२ लोकांनी लाभ घेतला.

ओएनजीसी आयोजक संघाचे नेतृत्व मेडिकल इन्चार्ज डॉ. संजीव पोटदुखे, प्रभारी एचआर डॉ. भावना आठवले, नागावचे सरपंच तसेच म्हातवलीच्या सरपंच रंजना पाटील यांच्या नेतृत्वाखाली गावातील स्वयंसेवकांच्या पथकाने शिबिरासाठी योगदान दिले.

# ‘सीकेटी’त ऑगस्ट क्रांती दिन,जागतिक आदिवासी दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवारी (दि. ९) राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस)च्या वतीने ऑगस्ट क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिन संयुक्तपणे साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत मोरे हे उपस्थित होते. तर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयाचे वरिष्ठ शिक्षक साईनाथ पाटील उपस्थित



होते. त्याचबरोबर विद्यालयाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे व विद्यार्थी तसेच इतर सहकारी शिक्षकांची उपस्थिती या कार्यक्रमास लाभली. एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी विवेक पाटील व गणेश पाटील यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

साईनाथ पाटील यांनी प्रमुख पाहुणे म्हणून आपले मनोगत व्यक्त करताना ऑगस्ट क्रांती दिन म्हणजे काय? हा दिन आपण का साजरा केला पाहिजे? याविषयी उदाहरणे देऊन विवेचन केले. प्राचार्य प्रशांत मोरे यांनी स्वातंत्र्यासाठी प्राणाचे बलिदान देणाऱ्या सर्वांचे आपण सदैव ऋणी असले पाहिजे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात एनएसएसच्या प्रचिती लबडे या विद्यार्थिनीने सादर केलेल्या प्रार्थनेने झाली. कार्यक्रमाचे संपूर्ण निवेदन अविनाश आदमाने या विद्यार्थ्याने केले.

ऑगस्ट क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिन याविषयी सानिया शेख, सीमा पिंगळे, अरुणा फुफाने, सुरज पारधी, कस्तुरी गायकवाड, अनिकेत सुरवसे या विद्यार्थ्यांनी आपापली मनोगते व्यक्त केली. तसेच कार्यक्रमाच्या शेवटी अरुणा फुफाणे, राजश्री दळवी, मेघा खुटाडे, पूजा हांडवा, ऋतिका कांबडी, या विद्यार्थिनींनी सुंदर असे आदिवासी तारपा नृत्य सादर केले.

कार्यक्रमात भाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके देऊन त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. अविराज राजवाडे या विद्यार्थ्याने आभार मानले.


## संपादकीय

# शिफारशींवर विचार हवा

न्यायमूर्तींच्या नेमणुकांवरून केंद्र सरकार व सर्वोच्च न्यायालय यांच्यात अलीकडेच वाद निर्माण झाला होता. आता संसदीय समितीच्या नव्या शिफारशींवरून पुन्हा वादाचाच धुरळा उडाला नाही म्हणजे झाले.

एकीकडे भारताचे सर्वोच्च न्यायालय हे जगभरातील सर्वांत शक्तिशाली संस्था असल्याचे मत कायद्याचे तज्ज्ञ व्यक्त करतात, त्याचवेळी देशातील न्यायप्रक्रियेतील दिरंगाईची गंभीर चर्चाही वर्षानुवर्षे होत राहते. आजवर अनेक वेळा निरनिराळ्या मंचांवर देशातील प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांची चर्चा झाली आहे. आपल्या देशातील न्यायसंस्थेच्या कामकाजाचे वर्णन कायमच 'तारीख पे तारीख' या शब्दांत केले गेले आहे व या अशा व्यवस्थेत सर्वाधिक भरडला जातो आहे तो देशातील सर्वसामान्य माणूसच. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायसंस्था हे लोकशाहीचे तीन प्रमुख स्तंभ मानले जातात व त्यातील न्यायसंस्थेकडे एक स्वायत्त संस्था म्हणून अतिशय आदराने पाहिले जाते. सरकार व संसद या दोन्ही अन्य स्तंभांच्या कामकाजासंदर्भात न्यायसंस्थेकडून मार्गदर्शनही केले जाते. सर्व अधिकार कुठल्याही एका संस्थेकडे एकवटून त्यांचा गैरवापर होऊ नये व त्यांच्याकडून परस्परांवर अंकुश ठेवला जावा याची दक्षता आपल्या संविधानाने घेतली आहे. त्याचधर्तीवर न्यायसंस्थेच्या व्यवहारात पारदर्शिकता आणण्याचा प्रयत्न यापूर्वीही झाला आहे. आताही नव्याने संसदेच्या कायदा आणि न्याय विभागाच्या समितीने न्यायालयीन प्रक्रियेत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने शिफारशी केल्या आहेत. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना संपत्ती जाहीर करणे अनिवार्य करण्यात यावे अशी शिफारस या समितीने केली आहे. भारतीय जनता पक्षाचे खासदार आणि बिहारचे माजी उपमुख्यमंत्री सुशीलकुमार मोदी यांच्या अध्यक्षतेखालील या समितीने केलेल्या शिफारशींवरून आता वादाला तोंड फुटण्याची चिन्हे आहेत. ज्याप्रकारे राजकीय नेते आणि सनदी अधिकाऱ्यांना वैयक्तिक संपत्तीचे तपशील जाहीर करावे लागतात, त्याचप्रमाणे न्यायमूर्तींनाही संपत्तीचे तपशील जाहीर करणे अनिवार्य करायला हवे अशी ही शिफारस आहे. यापूर्वीही अशी शिफारस केली गेली असून तिचे पालन करण्यास न्यायसंस्था तयार नसल्याने संसदेनेच आता याविषयी कायदा करावा असेही समितीने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयापासून सर्व राज्यांतील उच्च न्यायालये व जिल्हा आणि सत्र न्यायालये सर्वत्र असंख्य प्रकरणे प्रलंबित असल्याचे आकडेवारीवरून दिसते. एकीकडे अशी परिस्थिती असताना न्यायालयांचे कामकाज आजही वर्षातून अनेकदा सुट्यांच्या नावाखाली पूर्णपणे बंद असते. इतर असंख्य गोष्टींवर भाष्य करणारी न्यायसंस्था या विरोधाभासाविषयी उदासीन कशी असा प्रश्न कुणालाही पडेल. या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी न्यायाधीशांची संख्या वाढवावी, अशी सूचना वारंवार केली जाते व रिक्त पदांकडे बोट दाखवले जाते. ही रिक्त पदे भरण्याबरोबरच न्यायाधीशांच्या सुटीच्या कालावधीत कपात करण्याचाही विचार केला जायला हवा, असेही संसदीय समितीने म्हटले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करूनही खटले निकाली काढता येणार आहेत. देशात काही ठिकाणी सर्वोच्च न्यायालयाची पीठे सुरू करावीत अशीही शिफारस केली गेली आहे. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात न्यायमूर्तींची नेमणूक करताना महिला, अल्पसंख्याक आणि मागासवर्गीयांना आरक्षण मिळायला हवे, जेणेकरून सर्व सामाजिक घटकांना न्यायव्यवस्थेत प्रतिनिधित्व मिळू शकेल. न्यायप्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठीच्या सूचना यापूर्वीही केल्या गेल्या आहेत. आता संसदीय समितीच्या नव्या शिफारशींवरून पुन्हा वादाचाच धुरळा उडू नये व जनतेच्या हिताचे काही ठोस बदल न्यायव्यवस्थेत घडून यावेत हीच अपेक्षा.

# पोलादपूरातील वर्षा पर्यटनाचा विकास आवश्यक



**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्याच्या पर्यटन विकासाची स्वप्ने उराशी बाळगून असलेल्या अनेक दूर्गम भागातील ग्रामस्थांना रोजीरोटीसाठी तालुक्यातील निसर्ग सौंदर्य उपकारक ठरणार होते. अशातच, पोलादपूर शहरातील उत्तरवाहिनी सावित्री नदी आणि सावित्री नदीला येऊन मिळणाऱ्या घोडवनी, कामथी, चोळई, ढवळी या अन्य नद्यांनी २२ जुलै २०२१ रोजीच्या अतिवृष्टीवेळी नदीपात्र दुथडी भरून वाहण्यास सुरूवात केली आणि ढगफुटीसारख्या पावसाने पोलादपूर तालुक्यातील मोरझोतचा धबधबा, झुलता पुल आणि ब्रिटीशकालीन हिलस्टेशन कुडपण ही पर्यटनस्थळेदेखील उद्ध्वस्त झाली. पोलादपूर तालुक्यातील पर्यटनस्थळांचा विकास करण्यासाठी राज्याच्या पर्यटनराज्य मंत्री तथा रायगडच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी आता विशेष पाठपुरावा करीत विविध प्रकारच्या वर्षापर्यटनासाठी पुष्कळसा निधी उपलब्ध केला, मात्र काहींनी या निधीला कात्री लावण्याचा आग्रह धरल्याने निधी परत गेला.

११ वर्षांपूर्वी २५ जुलै २००५ दरम्यान झालेल्या अतिवृष्टी, भूस्खलन आणि महापूराच्या आस्मानी संकटानंतरही या निसर्गसौंदर्याला कुठेही बाधा आलेली दिसत नव्हती. खेडोपाडी जाणारे रस्ते आजही जरी या आपत्तीतून सावरलेले नसले तरी छोटया गाडयांतून तालुक्यांतील 'टूरिस्ट स्पॉट'पर्यंत जाणे अवघड नव्हते. अशातच, २२ जुलै २०२१ रोजी पोलादपूर तालुक्यात तब्बल ३८४ मि.मी. पाऊस पडला आणि रस्त्यांवर डोंगराने अंगातील माती सोडली. जागोजागी डोंगर कोसळले अन् सर्वच नद्यांचे प्रवाह रौद्रावताराने पात्र सोडूनही वाहू लागले. पोलादपूरनजिकच्या घागरकोंड येथील खास वर्षापर्यटनाचे आकर्षण केंद्र असलेला झुलता पुल याच नदीप्रवाहात वाहून गेला. सानेवाडी वाकण येथून घागरकोंड येथे जाण्यासाठी ग्रामस्थांकडून हा सर्वात कमी अंतराचा शॉर्टकट म्हणून वापरला जाणारा झुलता पूल वाहून गेल्याने आता द्राविडी प्राणायामसारखा वळसा घालून कापडे व पितळवाडीतील बाजारपेठेसाठी येथील लोकांना जावे लागणार आहे.

पोलादपूर तालुक्यातील उमरठ येथील नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीस्थळापासून काही किलोमीटर अंतरावरील खोपड आणि चांदकेदरम्यानच्या मोरझोत धबधब्याभोवती दरडींनी लालमातीचे डोंगर उभे राहिल्याने हा मार्ग बंद झाला आहे. मोरझोत धबधबा जरी आज अतिवृष्टी थांबल्यानंतर शुभ्रधारांनी कोसळत असला तरी अतिवृष्टीकाळात रौद्ररूपात रक्तरंजित लाल होऊन आदळत होता. मोठ्या प्रमाणावरील दरडी हटविण्यासोबतच धबधब्यासमोरची मोरी आता पुन्हा मजबूत करण्याची गरज निर्माण झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील ब्रिटीशकालीन हिलस्टेशन अशी नोंद असलेल्या कुडपण या गावातील अतिवृष्टी काळातील प्रचंड हानी या गावातील पर्यटनस्थळांना धोका पोहोचविणारी नसली तरी ग्रामीण जनजीवनाचे फार मोठे नुकसान करणारी ठरली आहे. कुडपण बुद्रुक आणि कुडपण खुर्द येथे शेती आणि लोकवस्तीचे जास्त नुकसान झाले आहे. भात शेतीची जमीन वाहुन गेली आहे आणि शेतीचे बांध फुटले आहेत. गावालगतच्या नदीमुळे आर.सी.सी. संरक्षण भिंत उभारण्याची आवश्यकता आहे. कुडपण बुद्रुकमधील नळपाणीपुरवठयाच्या पाईपलाईन्स वाहुन गेल्या आहेत. पावसाळयामध्ये विहीरी पावसाच्या पाण्याने भरत असल्याने या विहिरींनाच नवीन नळपाईप लाईनची जोडणी दुरुस्तीवेळी करण्याची गरज आहे. कुडपणच्या पहिल्या वाडीवर दोन घराचे नुकसान झाले आहे तर डोंगरमाथ्यावर रानोमाळी अनेक जमिनीला भेगा गेल्या असून भूस्खलन होत आहे. नदीच्या प्रवाहालगतचा रस्ता वाहून गेल्याने नव्याने संरक्षक भिंतीसह रस्ता बांधण्याची गरज आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेजवळील शौचालय तसेच बांध वाहून गेला आहे. शेलारांच्या कुडपण येथील आणि तीन नद्यांच्या संगमावरील सिमेंटबंधारा पुराच्या पाण्यामध्ये वाहून गेला आहे. भराडी नदीवरील एक पुल पडला आहे तसेच मधल्या कुडपण येथील एक जुना पुलही कोसळला आहे. आजही कुडपण या मिनी महाबळेश्वर हिलस्टेशनचे सौंदर्य अबाधित आहे.


महादेवाचा मुरा हे गोवेले आणि बोरघर ग्रामपंचायतींमध्ये विभागलेले गांव अद्याप पायी रस्त्याने बिकटवाटेचे असून रायगड जिल्हा परिषदेने क दर्जाचे पर्यटनक्षेत्र म्हणून नोंद करूनही अद्याप येथे कोणताही विकास साध्य झाला नाही.

गेल्या पाच वर्षांमध्ये या दोन्ही ग्रामपंचायती सामाजिक ग्रामविकास अभियानात असूनही महादेवाचा मुरा उपेक्षित राहण्यामागे या गावाची जबाबदारी पोलीस अधिक्षकांकडे दिली गेली होती. ज्यांना विकासात्मक प्रशासकीय माहितीसाठी पंचायत समिती आणि अन्य अधिकाऱ्यांवर अवलंबून राहावे लागत होते. याखेरिज, देवळे येथील शंकरमंदिरालादेखील पर्यटनाचा क दर्जा प्राप्त असून यंदाच्या पावसाळ्यामध्ये या मंदिराच्या परिसरामध्ये चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. श्रावण महिन्यामध्ये भाविकांना याठिकाणी मोठी कसरत करावी लागत आहे.

पोलादपूर तालुक्याच्या वर्षासहली दरम्यान, पर्यटकांना मोर, लांडोरी, रानकोंबडे आणि भेकरांचे दर्शन वनपर्यटनाचाही अनुभव देऊन जात असतो. येथील प्रदुषणविरहित शुध्द हवेत फिरताना पर्यटक अधिक तजेलदार होतात. याखेरिज, प्रदुषणविरहित गोडया पाण्यातील वांब, सकला, कटला, मुरगी, अहिर, खडशी, भिंग, मळयाचे मासे, शिंगटया, टोलकी, डाकू मासा, शिवडयाचे पातं, किरवी किंवा मुरी, मुठे (पांढरी खेकडी), झिंगे, चिंबोरी (लाल खेकडी) असे मासे व अष्टपाद उभयचर मांसाहारी पर्यटकांच्या जीभेवर वेगळीच अवीट चव रेंगाळत ठेवतात. या खवय्यांच्या जैवविधतेपैकी यंदाच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या भूस्खलनानंतर मातीमिश्रित पाणी घेऊन ओसंडून वाहणाऱ्या पोलादपूर तालुक्यातील ढवळी कामथी, घोडवनी आणि चोळई या चार प्रमुख नद्या पोलादपूर शहरापासून उत्तरवाहिनी सावित्री नदीला मिळाल्यानंतर नदीकाठी आणि नदीमध्ये काहीच उरले नसल्याचे दिसून आले आहे.

दरवर्षी आषाढात आणि श्रावणात गर्दी करणारे पर्यटक या पोलादपूरच्या निसर्गसौंदर्यासह वर्षासहलींची आठवण चिरस्मरणांत ठेवणारे पर्यटक यंदा आपत्तीपर्यटन करण्यास आले तर त्यांनी मदतीचा हात देण्याचीही गरज आहे. नजिकच्या काळात पोलादपूर तालुक्यातील सर्व वर्षापर्यटनाची स्थळं पर्यटन तत्कालीन राज्यमंत्री ना. अदिती तटकरे यांनी आढावा घेऊन तातडीने पूर्वस्थितीत आणण्यासाठी विकसित करण्यासाठी विविध पर्यटनस्थळी वेगवेगळया प्रकारे विकास साधण्यासाठी निधीची तरतूद केली, मात्र पोलादपूर नगरपंचायत निवडणुकीपासूनच स्थानिक आमदारांनी या निधींबाबत वेगवेगळ्या प्रकारे आमचे मंत्री असताना राज्यमंत्री कसे निधी आणणार अशी भाषा केली. कुडपणच्या पर्यटनविकासाबाबत तर कुडपणकरांनी सभेला अनुपस्थिती दर्शविल्यानंतर निधीच रद्द करायला लावतो, अशी उघडपणे तंबी दिली होती. कुडपणला राज्यमंत्री गेल्या तर काय झालं आम्ही कॅबिनेट दर्जाचे पर्यटन मंत्री घेऊन जाऊ, अशी भाषा करताना स्थानिक आमदार ना स्वत: मंत्री झाले ना ज्या कॅबिनेट मंत्र्यांना सोबत घेऊन जाण्याची भाषा केली ते कॅबिनेटमंत्री राहिले.

परिणामी, पोलादपूरच्या पर्यटन विकासाचा मार्ग सध्यातरी राजकीय सत्तांतरामुळे खुंटला आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# सॅमसंगच्या नव्या स्मार्टफोनमध्ये मिळणार इन्स्टट डिस्काउंट



सॅमसंग या लोकप्रिय मोबाइल उत्पादक कंपनीने भारतात आपला Galaxy F34 5G हा नवीन स्मार्टफोन लॉन्च केला आहे. स्मार्टफोनच्या महत्वाच्या फीचर्समध्ये ६००० mAh क्षमतेची बॅटरी, १२० Hz -MOLED डिस्प्ले आणि ५० ट्रिपल रिअर कॅमेरा सेटअप आणि Exynos १२८० चिपसेट यांचा समावेश आहे. आज आपण या लॉन्च झालेल्या नवीन फोनच्या फीचर्स, किंमत आणि प्री–ऑर्डर बद्दल अधिक माहिती जाणून घेऊयात.

सॅमसंग गॅलेक्सी F34 5Gमध्ये वापरकर्त्यांना ६.४६ इंचाचा S-AMOLED डिस्प्ले मिळणार आहे. ज्याचा रिफ्रेश रेट हा १२० Hz इतका आहे. तसेच यात कम्पनी १०० नीट्सपर्यंत पीक ब्राइटनेस ऑफर करतो तसेच हा फोन Exynos 1280 SoC द्वारे समर्थित आहे. फोनमध्ये ८ जीबी रॅम आणि १२८ जीबी इंटर्नल स्टोरेज ऑफर करण्यात आले आहे. हा फोन अँड्रॉइड १३ आधारित One UI ५.१ वर चालतो. याबाबतचे वृत्त Business Today ने दिले आहे.

फोटोग्राफीसाठी या फोनमध्ये वापरकर्त्यांना ट्रिपल रिअर कॅमेरा सेटअप मिळणार आहे. ज्यात ५० मेगापिक्सलचा प्रायमरी सेन्सर, ८ मेगापिक्सलचा अल्ट्रा वाईड अँगल लेन्स आणि २ मेगापिक्सलचा मॅक्रो सेन्सरचा समावेश आहे. रिअर कॅमेरा हा फीचरसह येतो. ज्यामुळे वापरकर्त्यांना एका शॉटमध्ये ४ व्हिडीओ आणि ४ फोटो कॅप्चर करता येतात. सेल्फीसाठी स्मार्टफोनमध्ये १३ मेगापिक्सलचा कॅमेरा मिळणार आहे.

बॅटरीच्या बाबतीत बोलायचे झाल्यास स्मार्टफोनमध्ये ६००० mAh क्षमतेची बॅटरी मिळते. ज्याला २५ W फॅट्स चार्जिंगचा सपोर्ट मिळतो. यामध्ये साइड माउंटेड फिंगरप्रिंट सेन्सर आणि चार्जिंग टाइप–सी पोर्ट येतो.

सॅमसंग Galaxy F34 5G दोन स्टोरेज व्हेरिएंटमध्ये लॉन्च करण्यात आला आहे. ६ जीबी रॅम आणि १२८ जीबी इंटर्नल स्टोरेज व्हेरिएंटची किंमत १८,९९९ रुपये, तर ८/१२८ व्हेरिएंटची किंमत २०,९९९ रुपये आहे. इलेक्ट्रिक ब्लॅक आणि मिस्टिक ग्रीन कलर व्हेरिएंटमध्ये तो आहे. हा नवीन स्मार्टफोन ११ ऑगस्टपासून विक्रीसाठी उपलब्ध असणार आहे.

# क्रिकेटपटू, समालोचक सुनील गावसकर



## निमित्त

सुनील गावस्कर, ज्यांना लिटल मास्टर असेही संबोधले जाते, ते एक महान फलंदाज आहेत. त्यांचे पूर्ण सुनील मनोहर गावस्कर आहे. एका कॅलेंडर वर्षात एक हजार धावा पार करणारा तो एकमेव फलंदाज आहे आणि त्याने ही जादू चार वेळा दाखवून दिली. सुनील गावस्कर यांनी आपल्या हयातीत अनेक विक्रम रचले आणि असंख्य विक्रम मोडले. डॉन ब्रॅडमनचा मागील विक्रम मोडून त्याने ३४ शतके ठोकली आणि १० हजार धावा पार करणारा तो एकमेव खेळाडू होता.

शालेय शिक्षण पूर्ण केल्यापासून सनीने एक प्रतिभावान क्रिकेटर म्हणून स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. सुनीलला १९६६मध्ये भारताचा सर्वोत्कृष्ट शाळा बीव पुरस्कार देण्यात आला. हायस्कूलच्या शेवटच्या वर्षात त्याने सलग दोन द्विशतके झळकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याने १९६६मध्येच रणजी खेळात पदार्पण केले होते. कॉलेजमध्ये लोक त्याच्या ऍथलेटिक्समध्ये पूर्णपणे उत्साही असायचे. रणजी सामन्यात कर्नाटकचे प्रतिनिधित्व करताना त्याने पुन्हा एकदा द्विशतक झळकावून निवडकर्त्यांना प्रभावित केले. १९७१मध्ये वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर जाणाऱ्या संघासाठी त्यांची निवड करण्यात आली होती.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या पदार्पणानंतरच सुनील गावस्कर यांना जागतिक स्तरावर ओळख मिळू लागली. त्याच्या खेळण्याच्या पद्धतीचा त्या काळातील तज्ज्ञांवर खूप प्रभाव पडला. त्याच्या १५ वर्षांच्या कारकिर्दीत सर्वोच्च पातळीवर ३४ जागतिक विक्रम नोंदवले गेले. सर्वोत्तम सलामीवीरांपैकी एक असलेल्या गावस्करने १२५ कसोटीत १० हजार १२२ धावा केल्या. कसोटी क्रिकेटमध्ये १० हजार धावा करणारा तो पहिला क्रिकेटपटू होता. तथापि, ॲलन बॉर्डरने त्याला मागे टाकले. जवळपास २० वर्षे सर्वाधिक शतक ठोकण्याचा विक्रम गावसकर यांच्या नावावर होता, मात्र त्यानंतर मुंबईच्या सचिन तेंडुलकरने तो मोडला.

१९७१मध्ये याच दौऱ्याच्या तिसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी क्रिकेट खेळताना गावस्कर यांनी पहिले शतक नोंदवले. क्वीन्स पार्क ओव्हलवर अंतिम सामन्यात त्याने हेल्मेटशिवाय वेस्ट इंडिजच्या धोकादायक गोलंदाजांचा सामना केला. खेळाच्या दोन्ही डावात दोन शतके झळकावली आणि संघाला वाचवले. अशी करिष्माई कामगिरी करून तो दुसरा खेळाडू म्हणून भारतीय संघात सहभागी झाला.

बरोबर सात वर्षांनंतर १९७८ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेतील एकाच डावात पुन्हा एकदा दोन शतके ठोकणारा तो पहिला खेळाडू ठरला. त्याने या खेळात उत्कृष्ट खेळ केला आणि दुसऱ्या डावात नाबाद १८२ धावा केल्या. हेडिंग्ले स्टेडियमवर गावस्कर यांनी इंग्लंडविरुद्ध एकदिवसीय आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. गावसकर यांची वनडे स्पर्धेतील कामगिरी कसोटी सामन्यापेक्षा कमी चमकदार होती. गावसकरने एकूण ३०९२ धावा केल्या, सरासरी ३५. गावसकर या प्रकारच्या खेळात खेळले आणि काही उल्लेखनीय खेळी केल्या.

ऑस्ट्रेलियासोबत बेस आणि हेजेस मॅचअपमध्ये. १९८७च्या विश्वचषकादरम्यान न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय सामन्यात गावस्कर यांनी शतक झळकावले. त्याला सध्या ताप येत होता. निवृत्त होण्यापूर्वीच्या अंतिम सामन्यात, गावस्करने केवळ ८८ चेंडूत शतक झळकावून भारताला महत्त्वपूर्ण विजय मिळवून दिला. या दमदार कामगिरीसाठी त्याला सामनावीर म्हणूनही गौरविण्यात आले. सध्या तो समालोचकाच्या भूमिकेत आहे.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**

(छाया : रोशन कवळे)



**अलिबाग : सुटी वगळता इतर दिवशी आवास सावसवणे येथील समुद्रकिनारी नागरिकांची वरदळ कमी पहावयास मिळाली.**

## आरोग्य प्रहर

# महिलांमध्ये वाढतोय हार्ट अटॅकचा धोका; 'या' गोष्टी टाळा



सध्या पुरुषांसह स्त्रियांमध्येही हार्ट अटॅकचा धोका वाढला आहे. त्यात वयोवृद्ध व्यक्तींपेक्षा कमी वयात म्हणजे तरुणांमध्ये विशेषत: तरुणींमध्ये हार्ट अटॅकने मृत्यू होणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या विषयी नवी दिल्लीच्या फोर्टिस एस्कॉर्ट हार्ट इन्स्टिट्यूट–ओखला येथील इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजीचे संचालक डॉ. निशिथ चंद्रा यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

डॉ. निशिथ चंद्रा सांगतात, मासिक पाळीदरम्यान महिलांच्या शरीरात इस्ट्रोजन सक्रिय असतो. त्यामुळे महिलांना हार्ट अटॅकचा धोका नसतो, पण हार्ट स्पेशॅलिस्ट म्हणून आम्हाला हार्ट अटॅकच्या कोणत्याही लक्षणांकडे जसे की महिलांचे छातीत दुखणे याकडे दुर्लक्ष करता येत नाही. धूम्रपानामुळे पुरुष आणि महिलांमध्ये हार्ट अटॅकचा धोका दोन ते चार पटींनी वाढला आहे. विशेषत: ज्या महिला धूम्रपान करतात त्यांना पुरुषांच्या तुलनेत हार्ट अटॅकचा धोका २५ टक्क्यांनी जास्त असतो.

तरुण महिलांना कामाच्या ठिकाणी खूप जास्त प्रमाणात तणावाचा सामना करावा लागतो. आजच्या स्पर्धात्मक जगात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियाही प्रत्येक क्षेत्रात नाव कमावत आहेत. अशा वेळी घरची जबाबदारी, कौटुंबिक वेळ आणि कामाच्या ठिकाणी तणाव दिसून येतो. त्यामुळे महिलांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होतो.

अनेकदा महिला गर्भधारणा टाळण्यासाठी गर्भनिरोधक गोळ्यांचे सेवन करतात. या गोळ्यांचाही आरोग्यावर दुष्परिणाम दिसून येतो. चुकीच्या लाइफस्टाईलमुळेही थेट आरोग्यावर दुष्परिणाम होतो. लठ्ठपणा, सतत बसून काम करणे, अयोग्य आहार, उच्च रक्तदाब, व्यायामाचा अभाव इत्यादी कारणांमुळे आरोग्य बिघडते आणि हे घटक मधुमेहासाठीही कारणीभूत असतात. त्यामुळे मधुमेहींना हृदयविकाराचा धोका चार पटींनी जास्त दिसून येतो.

नियमित आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. त्यामुळे कोणताही आजार लवकर ओळखता येतो. अनेकदा वेळेपूर्वी योग्य उपचार सुरू करता येतात. लक्षणे दिसताच त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा.

# सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्ते दुरुस्ती

## नवी मुंबईत कामांना गतिमानता

**नवी मुंबई : बातमीदार**

१७ ते २९ जुलैपर्यंत संततधार पाऊस कोसळत या कालावधीत ८७४.९० मि.मि. इतक्या मोठया प्रमाणावर पर्जन्यवृष्टी झाली. या कालावधीत महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर नवी मुंबईतील परिस्थितीवर संपूर्ण लक्ष ठेवून होते. त्या अनुषंगाने नवी मुंबई महापालिकेची आपत्कालीन मदत यंत्रणा दक्षतेने कार्यरत होती. आयुक्तांनी स्वत: भर पावसात नवी मुंबई महापालिका क्षेत्राचा पाहणी दौराही केला.

आता पावसाची तीव्रता काहीशी कमी होऊन उघडीप मिळाल्यानंतर रस्ते दुरुस्तीची कामे जलद हाती घेऊन सध्याचा श्रावणी सणांची तसेच आगामी गणेशोत्सवाचा कालावधी लक्षात घेत या रस्ते दुरूस्ती कामांना गती द्यावी, असे निर्देश आयुक्त राजेश नार्वेकर यांचेमार्फत अभियांत्रिकी विभागास देण्यात आले होते. त्यानुसार दिघा ते बेलापूर या सर्वच विभागांतील रस्ते दुरुस्तीची कामे जलद गतीने हाती घेण्यात आली असून सर्व विभागातील कार्यकारी अभियंता हे आपापल्या विभाग कार्यालय क्षेत्रातील कामांवर तसेच शहर अभियंता संजय देसाई सर्वच रस्ते दुरुस्ती कामांवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. शहर अभियंता नियमित पाहणी दौऱ्यांद्वारे या कामांवर काटेकोर लक्ष देत आहेत.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील रस्ते दुरुस्तीचे वार्षिक स्वरुपात देखभाल-दुरुस्ती कंत्राट करण्यात आले असून रस्ते दुरुस्तीची कामे वर्षभर नियमितपणे सुरू असतात. त्यामुळे इतर शहरांच्या तुलनेत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते खराब होण्याचे प्रमाण काहीसे कमी आहे व दुरूस्त करण्याचा कालावधीही जलद आहे. विभागनिहाय आठ तसेच एमआयडीसी क्षेत्राकरिता दोन असे



१० कंत्राटदार रस्ते दुरुस्तीची कामे करीत असून या कंत्राटदारांमार्फत नियमितपणे रस्ते दुरूस्ती केली जात आहे. आपल्याला नेमून दिलेल्या क्षेत्रातील रस्त्यांची नियमित पाहणी करणे व आवश्यक त्या ठिकाणी त्वरित दुरुस्ती करणे हे या कंत्राटदारांचे काम असून ४८ तासांत दुरुस्ती कार्यवाही न झाल्यास या कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते.

पावसाळी कालावधीकरिता अभियांत्रिकी विभागाने विभागनिहाय रस्ता दुरुस्ती विशेष पथके तयार केली असून ही पथके आपापल्या विभाग क्षेत्रात फिरती राहून रस्ते दुरुस्तीची कामे करीत आहेत.

नवी मुंबई शहर हे समुद्रसपाटीच्या खालील पातळीवर वसलेले असून भरतीच्या कालावधीत अतिवृष्टी झाल्यास शहरातील काही सखल भागात पाणी साचून राहते. हे पाणी उपसण्यासाठी व जलद पाणी निचरा होण्यासाठी महापालिकेच्या वतीने पुरेशा प्रमाणात पाणी उपसा पंपासह इतर आवश्यक व्यवस्था केली जात आहे. तथापि शहरातील काही सखल भागात पाणी साचून राहत असल्याने त्याठिकाणी असलेल्या रस्त्यांच्या पृष्ठभागाची काही प्रमाणात हानी होते. तथापि यामुळे नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये याची पूर्णपणे काळजी घेत रस्ते सुस्थितीत ठेवण्याचे निर्देश महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिले असून श्रावणातील सण-उत्सव व आगामी गणेशोत्सव कालावधी लक्षात घेऊन अभियांत्रिकी विभाग रस्ते दुरुस्तीची कार्यवाही अधिक काळजीपूर्वक करीत आहे.

### तक्रार निवारण प्रणाली कार्यरत

**नियमितपणे रस्ते पाहणी करण्यात येऊन आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्ती करण्यात येते. याशिवाय महापालिकेच्या नागरिक तक्रार निवारण प्रणालीवर (Public Grievance System) तसेच विविध माध्यमांव्दारे प्राप्त होणाऱ्या रस्त्यांबाबतच्या तक्रारींवर त्वरित दुरुस्ती कार्यवाही करण्यात येत आहे. रस्त्यांच्या तक्रारीबाबत नवी मुंबई महापालिकेने ८४२४९४८८८८ हा व्हॉट्सॲप क्रमांक नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध करून दिलेला असून आपत्ती निवारण कक्षाचे टोल फ्री क्रमांक १८००२२२३०९ / १० यावर तसेच नवी मुंबई महापालिकेच्या तक्रार निवारण प्रणालीवर रस्त्यांविषयीच्या तक्रारी व सूचना नागरिक दाखल करू शकतात.**

## नवी मुंबईतही मेरी माटी मेरा देश अभियान



**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त केंद्र सरकारच्या वतीने 'माझी माती माझा देश' अर्थात 'मेरी माटी मेरा देश' हे राष्ट्रीय अभियान राबविले जात असून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आज ९ ऑगस्ट रोजी अभियानाच्या पहिल्या दिवशी नेरूळ येथील ज्वेल ऑफ नवी मुंबई या पर्यटनस्थळी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या अंतर्गत देशासाठी हौतात्म्य पत्करलेल्या शहीद आणि वीरांचा नामोल्लेख असणारा शिलाफलक उभारण्यात आला असून त्यासमोर प्रज्वलीत दीप ठेवून वीरांना वंदन करण्यात आले. त्याचप्रमाणे पंचप्रण शपथ, अमृत वाटिकेची वृक्षारोपणाव्दारे निर्मिती, शहीद वीरांच्या कुटूंबीयांचा सन्मान, ध्वजारोहण व राष्ट्रगान असे विविध कार्यक्रम एक हजाराहून अधिक नागरिक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत उत्साहात झाले.

या वेळी ऐरोली विधानसभा सदस्य आमदार गणेश नाईक, बेलापूर विधानसभा सदस्य आमदार मंदा म्हात्रे, विधानपरिषद सदस्य आमदार रमेश पाटील, नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर, सह पोलीस आयुक्त संजय मोहिते, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे संचालक मनोज रानडे, अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ, माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक तसेच लोकप्रतिनिधी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवी मुंबई हे देशाच्या विविध राज्यातील नागरिकांना एकात्म भावनेने बांधून ठेवणारे शहर असून 'मिनी भारत' म्हणून ओळखले जात असल्याचे सांगत ऐरोली विधानसभा सदस्य आमदार गणेश नाईक यांनी शहीदांबद्दल आपल्या मनात असलेला आदर व मातृभूमीविषयीचे प्रेम व्यक्त करण्यासाठी मा. पंतप्रधान महोदयांनी जाहीर केलेला 'मेरी माटी मेरा देश' हा उपक्रम त्यागातून निर्माण झालेले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची सदैव प्रेरणा देत राहील अशी भावना व्यक्त केली.

बेलापूर विधानसभा सदस्य आमदार मंदा म्हात्रे यांनी 'मेरी माटी मेरा देश' हा सर्वांना देशप्रेमाच्या भावनेतून जोडणारा उपक्रम असल्याचे सांगत देशाचे भविष्य असणारे विद्यार्थी या कार्यक्रमात मोठया संख्येने सहभागी झाल्याबद्दल प्रशंसा केली. पंतप्रधान महोदयांना अभिप्रेत असलेला विकसीत भारत घडविण्यासाठी हा उपक्रम महत्वाचे असल्याचे सांगत त्यांनी मागील वर्षीप्रमाणेच यावर्षीही 'हर घर तिरंगा' उपक्रम यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

## महसूल सप्ताहांतर्गत कोकण विभागाची अव्वल कामगिरी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महसूल सप्ताहादरम्यान कोकण विभागात सात महसूल सहाय्यक व २१ तलाठयांना अनुकंपातत्तावर नियुक्तीपत्र देण्यात आले असून, पाच हजार ७२१ उत्पन्नाचे दाखले, एक हजार ८८९ राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, एक हजार ६३१ जातप्रमाणपत्र आणि आठ हजार ८५० खरीप हंगामातील पीक विमा दाखल्यांचे वाटप करण्यात आले आहे. राज्यभरात आयोजित करण्यात आलेल्या महसूल सप्ताहात डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण



विभागाने अव्वल काम केले आहे. कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी महसूल सप्ताह यशस्वी होण्यासाठी विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांपासून इतर सर्व यंत्रणांना विशेष सुचना दिल्या होत्या. या सप्ताहात कोकण विभागातील जास्तीत जास्त नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा, त्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढावी, नैसर्गिक आपत्ती काळातील नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई मिळावी, विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणारे दाखले या महसूल सप्ताहा दरम्यान एकाच ठिकाणी सहजतेने प्राप्त व्हावे यासाठी आयुक्त डॉ. कल्याणकर यांनी संपूर्ण विभागात सुक्ष्म नियोजन केले होते. या संपूर्ण सप्ताहादरम्यान आयुक्तांनी स्वत: प्रत्येक जिल्हयातील विविध उपक्रमांमध्ये भाग घेतला. तसेच आयोजित केलेली शिबीरे व कार्यशाळांना उपस्थित राहून सुचनाही दिल्या. नागरिक, वृध्द, विद्यार्थी, माजी सैनिक, सिनिकांचे कुटूंबिय, नैसर्गिक आपत्तीग्रस्त यांनी मोठ्या संख्येने या महसूल सप्ताहात लाभ घेतला अहे.

## शासकीय उपक्रमात सहभागाचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथे नवी मुंबई पालिकेतर्फे आयोजित केलेल्या माझी माती, माझा देश उपक्रमात अनेक जणांनी माती किंवा मातीचे दिवे हातात घेऊन सेल्फी व छायाचित्रे काढली आणि आपल्या सोशल मिडीया अकाऊंटवरून प्रसिध्द केली.

ही मातीचे दिवे अथवा माती हातात घेऊन किंवा वृक्षारोपण करताना किंवा राष्ट्रध्वज हातात घेऊन फडकवितानाचे सेल्फी किंवा छायाचित्रे काढून ती छायाचित्रे https://merimaatimeradesh.gov.in या शासनाच्या पोर्टलवरही अपलोड करावयाची असून त्यानंतर या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल केंद्र सरकारमार्फत ऑनलाईन प्रमाणपत्रही वितरीत केले जात आहे. ९ ते १४ ऑगस्ट या कालावधीत प्रत्येक नागरिकाने मातृभूमीविषयीचे व शहीद वीरांविषयीचे आपले प्रेम व अभिमान आपले छायाचित्र अभियानाच्या वेबसाईटवर अपलोड करुन सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी केले आहे.

## नवी मुंबईत आध्यात्मिक मैत्री दिवस

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज भक्त सेवा मंडळ, नवी मुंबई आयोजित युवा सेना अंतर्गत हनुमान मंदिर, तुर्भे गाव येथे आध्यात्मिक मैत्री दिवस झाला.

प.पू. जगद्गुरुश्री व प.पू. कानिफनाथ महाराज यांच्या कृपाशिर्वादाने तसेच प.पू. जगद्गुरुश्रींची शिकवण तुम्ही जगा दुसऱ्याला जगवा हा संदेश मनामध्ये रुजवत युवा घडत आहेत. अनेक युवांचे खेळ जिल्हा युवा अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनानुसार झाले. तसेच माजी जिल्हा अध्यक्ष महेश बांद्रे यांनी अत्यंत सुरेख मैत्री हा विषय घेवून युवांना संबोधित केले. युवांना मार्गदर्शन केले. १० व १२ विद्यार्थ्यांना पारितोषिक देवून गौरविण्यात आले.

कार्यक्रमावेळी जिल्हा व्यवस्थापक शिवाजी करकरे, जिल्हा निरिक्षक प्रकाश शिंदे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख संजय देशमुख, संजिवनी प्रमुख सचिन खिरिट, देणगी प्रमुख प्रभाकर भुजबळ, युवा अध्यक्ष नितीन पाटणकर, शिबिर प्रमुख शुभम ढवळे व संत संगातील युवा उपस्थित होते.



## नवी मुंबईत शनिवारी मंगळागौर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवीन लग्न झाल्यावर अनेक विधी असतात अनेक सण साजरे करायचे असतात. श्रावण महिन्यात तर अनेक विधी पूजा आणि सण साजरे केले जातात. नव्या नवरीचा असाच एक साजरा करण्यात येणारा सण म्हणजे मंगळागौर कार्यक्रम याच संदर्भात श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवासंस्थेमार्फत या पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी संस्थेच्या अध्यक्ष व बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था ही गेली २८ वर्षे सांस्कृतिक महोत्सव व विविध समाजपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करीत आहेत. तसेच श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्थेच्या वतीने सालाबादप्रमाणेप्रमाणे




१२ ऑगस्ट २०२३ रोजी ठीक सकाळी ९ ते दुपारी ०२ वाजेपर्यंत वाशी येथील विष्णुदास भावे नाटचगृह येथे खास महिलांकरिता मंगळागौरीचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात विविध खेळ खेळण्याचा अनादी काळापासून चालत आलेला प्रघात दिसून येणार आहे. या मंगळागौरीच्या कार्यक्रमात उत्कृष्ट नृत्य, पारंपारिक गायन व विविध प्रकारच्या कला दाखविणाऱ्या महिलांना प्रथम पारितोषिक ५००१ रुपये, द्वितीय पारितोषिक ३००१ रुपये, तृतीय पारितोषिक २००१ रुपये तसेच उत्तेजनार्थ यांना बक्षिस देऊन गौरविण्यात येणार आहे व लकी ड्रॉच्या माध्यमातून नशीबवान महिला विजेत्याला पैठणी / नथ अशा विविध प्रकारची बक्षीस देऊन सन्मानित केली जाणार आहे. तसेच बक्षीस वितरण समारंभ हे त्याच दिवशी होणार आहे.

संस्थेच्या अध्यक्षा व बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, मंगळागौरी कार्यक्रम हा फक्त १५१ बेलापूर विधानसभा महिलांसाठी मर्यादित असून प्रवेश हे विनामुल्य आहे व नाव नोंदणी तसेच महिला बचत गटांना स्टॉल (विनामूल्य) लावायचे असल्यास त्यांनी आरती राऊल (९९६७६४८०९१), हेमंत कोळी (९१६७३०२८२७), आदित्य नेवरेकर (७३०४३३९३३३) यांना संपर्क साधायचा आहे. तसेच नोंदणीची अंतिम तारीख ही १० ऑगस्ट २०२३ रोजी संध्याकाळी ६ वाजेपर्यंत असणार आहे याची सर्व महिलांनी नोंद घ्यावयाची आहे.

## नेरूळमधील सोसायट्यांमध्ये ब्लिचिंग पावडरची फवारणी

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजपच्या युवती अध्यक्षा सुहासिनी नायडू यांनी स्वखर्चाने सोसायट्यांमध्ये ब्लिचिंग पावडर फवारणी केली आहे.

पावसामुळे रस्ते व पदपथांसह सोसायट्यांच्या आवारातील परिसरातदेखील शेवाळे साठले आहे. त्यामुळे नागरिकांना चालताना त्रास होत आहे. ज्येष्ठ नागरिकांना चालताना इमारतींचा आधार घ्यावा लागत आहे. तर लहान मुलेदेखील खेळताना घसरून पडल्याचे प्रसंग घडू लागले आहेत. याबाबत भाजपाच्या युवती अध्यक्षा सुहासिनी नायडू यांना ही बाब समजताच त्यांनी स्वखर्चाने ब्लिचिंग पावडर आणून नेरूळ सेक्टर २ व ४ तसेच जुईनगर येथील सेक्टर २४ येथे सोसायट्यांमध्ये फवारणी करून घेतली.

यासह सोसायट्यांबाहेरील पदपथांवरदेखील फवारणी करण्यात आली. नायडू यांचे सोसायट्यांमधील नागरिकांनी आभार मानले.



## उरण महाविद्यालयातर्फे पागोटे येथे वृक्षारोपण

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने बुधवारी (दि. ९) पागोटे ग्रामपंचायत परिसर आणि पागोटे येथील जिल्हा परिषद मराठी शाळा परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून भारत सरकारच्या मेरी माटी मेरा देश उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. या वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आली. या कार्यक्रमावेळी महाविद्यालयाचे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. पी. हिंगमिरे, प्रा. ए. आर. कांबळे, प्रा. विनिता तांडेल तसेच ग्रामपंचायतचे सदस्य गण आणि एनएसएसचे स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.



## गर्भवतींना पोषक खाद्यान्नवाटप



**नवी मुंबई : बातमीदार**

संयुक्त राष्ट्राने यंदाचे वर्ष अन्न / भरडधान्य घोषित केले आहे. त्या पार्श्वभूमीवर ज्वारी, बाजरी, नाचणी, मका, कुट्टू, राजगिरा, कोंदरा, कुटकी आदी पोषक भरड धान्य गर्भवती महिलांना माजी नगरसेविका माधुरी सुतार यांच्या पुढाकाराने वाटप करण्यात आले.

नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष माजी आमदार संदीप नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप नेत्या प्रा. वर्षा भोसले यांच्या उपस्थितीत शिरवणे गाव व नेरुळ सेक्टर १ येथे सुमारे ७० गर्भवती महिलांना करण्यात आले. या वेळी माधुरी सुतार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच प्रभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा वर्कर्स रंजीता घरत, दीपिका सुतार, गीता पालवे, मीना पवार, उज्ज्वला चौधरी, दीपाली जाधव यांचा सत्कार प्रा. वर्षा भोसले यांच्या हस्ते करण्यात आला.या वेळी भाजपचे जयेंद्र सुतार, प्रभाकर ठाकूर, वॉर्ड अध्यक्ष अरुणा भोईर, महिला बचत गट संघटिका मीनाक्षी हिलाल, माधुरी रोडे, वर्षा पवार, अनिता पाटील आदी उपस्थित होते.

## 'सानपाडा, जुईनगरमध्ये आरोग्य व जनजागृती शिबिरांचे आयोजन करा'

**नवी मुंबई : बातमीदार**

पावसाळ्यातील साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर सानपाडा नोडमधील महापालिका प्रभागांमध्ये आरोग्य तपासणी शिबिर व जनजागृती शिबिरांचे आयोजन करण्याची लेखी मागणी भारतीय जनता युवा मोर्चा, नवी मुंबईचे जिल्हा उपाध्यक्ष व अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त राजेश बांगर यांच्याकडे एका लेखी निवेदनातून केली आहे.

गेल्या दोन महिन्यापासून नवी मुंबईत पाऊस पडत आहे. पावसाळा आणि नवी



मुंबईत असणारे साथीचे आजार हे वर्षानुवर्षाचे समीकरण जुळलेले आहे. दोन महिन्यात पडणाऱ्या पाऊसामुळे सानपाडा नोडमध्ये, जुईनगर नोडमध्ये, सानपाडा पामबीच तसेच सानपाडा गावामध्ये, जुईपाडा गावामध्ये ताप, मलेरिया, डेंग्यू आदी साथीचे रुग्ण दिसू लागले आहेत. साथीच्या आजाराचे रूग्ण खासगी दवाखाने तसेच मेडिक्लेम असल्याने खासगी रुग्णालयांमध्ये उपचार घेत असल्याने पालिका दरबारी या रुग्णांची नोंद होत नाही. त्यामुळे महापालिका प्रशासनाच्या आरोग्य विभागाने साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर सानपाडा नोडमध्ये, जुईनगर नोडमध्ये, सानपाडा पामबीच तसेच सानपाडा गावामध्ये, जुईपाडा गावामध्ये आरोग्य शिबिरांचे आयोजन करणे आवश्यक आहे. तसेच साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर आजार होवू नये आणि आजार झाल्यावर काय करावे याबाबत जनजागृती शिबिराचेही आयोजन करणे आवश्यक आहे.

याशिवाय त्या त्या विभागातील नागरी आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांकडून घरोघरी जावून साथीच्या आजाराबाबत लोकांशी सुसंवाद साधणे आवश्यक आहे. साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाला सानपाडा नोडमध्ये, जुईनगर नोडमध्ये, सानपाडा पामबीच तसेच सानपाडा गावामध्ये, जुईपाडा गावामध्ये आरोग्य शिबिरांचे व जनजागृती शिबिर आयोजनाचे निर्देश देण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

## निवडक



### खरविली प्राथमिक शाळेत वह्यावाटप

**खालापूर** : भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त साजगाव विभागप्रमुख भरत महाडिक यांच्या संकल्पनेतून व सनी यादव यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि. ८) छत्तीशी विभागातील खरविली प्राथमिक शाळेत वह्या, पुस्तके व खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी भाजप रायगड जिल्हा कोषाध्यक्ष सनी यादव, सरपंच सुंदर पवार, विभाग प्रमुख साजगाव भरत महाडिक, शांताराम पाटील, मिलिंद दाभोलकर, पुंडलिक पाटील, अशोक पाटील, रवींद्र मोरे, परशुराम पाटील, संतोष महाडीक, बाळू कासार, शिवाजी पाटील, उत्तम महाडिक, मनोहर वाझे, कल्पेश महाडिक, हनुमंत महाडिक, नारायण मोहिते, रामदास पालांडे, मुख्याध्यपिका सुप्रिया नवले, शिक्षक संजय रिंगे, रवींद्र घोगरे आदी उपस्थित होते.

### कंत्राटी कामाकरिता प्रस्तावाचे आवाहन

**अलिबाग** : बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायट्यांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्याच्या उद्देशाने तीन लाखांपर्यंतची कामे विनानिविदा उपलब्ध करुन देण्यासाठी रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या शासन निर्णयान्वये जिल्हा स्तरावर काम वाटप समितीची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुषंगाने ज्या सेवा सोसायट्यांचे कार्यक्षेत्र पेण तालुक्याकरिता आहे, अशा सेवा सोसायट्यांना कामाची आवश्यकता असल्यास कंत्राटी काम मिळण्याबातचे आपले प्रस्ताव २१ ऑगस्टपर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात स्वहस्ते सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वृद्ध व्यक्तीचे ४९ हजार लंपास

**महाड** : स्टेट बँकेत आलेल्या एका वयोवृद्ध व्यक्ति चे पेन्शनचे ४९ हजार रुपये अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची धक्का दायक घटना घडली आहे. सोमवार (दि. ७) सकाळी १०:३० ते १२:३० वाजण्याच्या दरम्यान पास बुक ची नोंद करत असताना सखाराम आनंद मोरे (वय ७५ रा. फौजीआंबवडे) यांनी सोमवारी सकाळी स्टेट बँक महाड शाखेमधून आपल्या पेन्शनचे ४९ हजार रुपये काढले आणि ही रक्कम आपल्या बॅगमध्ये ठेऊन पासबुकची नोंद करण्यासाठी रांगेत उभे राहिले. यादरम्यान चोरट्याने या बॅगमधून ही रक्कम चोरून नेली. या चोरीची नोंद महाड शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# साथीच्या रोगांवर मात करण्यासाठी दक्षता

## माणगावातील सहा आरोग्य केंद्रात डॉक्टरही सज्ज

**माणगाव : प्रतिनिधी**

हवामानातील बदलामुळे कधी ऊन, पाऊस यामुळे सतत बदल घडत आहेत. त्यामुळे विविध साथीचे आजार वाढण्याचे धोके संभवतात. अनेक गावांना विहीर व नदीतील पाण्याचा पिण्यासाठी वापर केला जातो. ते पाणी नागरिकांनी गाळून व उकळून प्यावे असे आवाहन सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केले असून पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या साथीच्या रोगांबाबत योग्य ती घबरदारी घेण्यात येत आहेत. तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे, तर उपजिल्हा रुग्णालय स्वतंत्र आहे. सहा आरोग्य केंद्रात पुरेशा औषधाबरोबरच वैद्यकीय अधिकारी वर्गही पुरेसा आहे. त्यामुळे नागरिकांना सहज उपचार मिळत आहेत.




पावसाळी हंगामात कोणत्याही स्वरूपाचे साथ रोग उद्‌भवू नये याकरिता माणगाव तालुका आरोग्य विभागाने विशेष दक्षता घेतली असून दरवर्षी पावसळ्यात सर्वत्र दमट व दलदलीचे साम्राज्य निर्माण होते. अशा वातावरणात निरनिराळे मानवांचे आरोग्य बिघडविणारे उपद्रवी कीटकांची पैदास होऊन कीटकजन्य व जलजन्य आजार साथीचा उद्रेक स्वरुपात उद्‌भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरिता माणगाव तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत स्तरावर ग्रामपंचायतीने घ्यावयाची काळजी व नियोजन करण्याच्या सूचना माणगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुशीम भारसाखळे यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत.

यासाठी नगरपंचायत, ग्रामपंचायतीनी पिण्याचे पाण्याचे जलस्त्रोतांची व परिसराची योग्य ती डागडुजी व स्वच्छता करणे, पाईपलाईन दुरुस्ती करणे व गळती असलेले कॉक बदलण्यात यावे, योग्य प्रमाण असलेले टीसीएल पावडर खरेदी करून तिचे योग्य रीत्या साठवणूक करणे, ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये असलेल्या सर्व जलस्त्रोतांचे नियमित शुद्धीकरण करणे, ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात डबकी साचू नये यासाठी उपाययोजना करणे, वेळीच ते बुजविण्यात यावे याची काळजी ग्रामपंचायतीने घेणे अपेक्षित आहे.

माणगाव उपजिल्हा रुग्णालय व सहा प्राथमिक आरोग्य केंद्र असून ही आरोग्य केंद्रे निजामपूर, शिरवली, साई, गोरेगाव, इंदापूर व नांदवी येथे कार्यरत असून या ठिकाणी पुरेसे वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी वर्ग व पुरेसा औषधासाठी तसेच रुग्णवाहिकेच्या उत्तम, वातानुकूलित रुग्णवाहिका उपलब्ध आहे, तसेच पुरेसा ऑक्सिजन साठा व औषधे उपलब्ध आहेत. शासनाच्या येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून रुग्णांना जास्तीत जास्त सेवा पुरवून आपले कर्तव्य बजावत आहेत.

# इर्शाळवाडी दुर्घटनाग्रस्तांचे पुर्नवसन लवकरच

## तहसीलदार आयुब तांबोळी यांचे आश्वासन

**खोपोली : प्रतिनिधी**

इर्शाळवाडीची दुर्घटना अतिवेदनादायी आहे. अशी दुर्घटना घडू नये, यासाठी प्रशासन खबरदारी घेणार डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या वाड्यांचा सर्व्हे सुरू आहे. इर्शाळवाडीतील दुर्घटनेत बचावलेल्या लोकांचे तात्पुरते पुनर्वसन कंटेनरमध्ये केले आहे. या ठिकाणी २४ तास स्वच्छ पाणी, शौचालय, गरम पाणी, मेडीकल व्यवस्था, पोलीस बंदोबस्त तसेच लहान मुलांसाठी अंगणवाडी उपलब्ध करून दिली आहे. कायमच्या जागेचा प्रश्न मार्गी लागला आहे. लवकरच पक्के घर बांधून पूर्नवसन करण्यासाठी शासन पाठपुरावा करीत आहे, अशी माहिती खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोली यांनी दिली.



या वेळी प्रकल्प अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अधिकारी प्रशांत आखाडे, सहाय्यक पोलीस निरिक्षक रसायनी जी. बी. बालवडकर, वनविभाग अधिकारी कुलदिप पाटकर, नायब तहसीलदार कदम, खोपोली नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी गौतम भगळे आणि सर्व विभागाचे अधिकारी, आदिवासी अधिकार संघर्ष समिती अध्यक्ष माळू निरगुडे, सचिव दत्ता निरगुडे, सामाजिक कार्यकर्ते दिलीप डाके, पांडुरंग पारधी, महादेव पिरकड, सुरेश बागारी, राम शिगवा, विष्णू खैर, मारुती पवार यांच्यासह मोठ्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते.

खालापूर आदिवासी वाड्यांचे सर्व्हे सुरू आहे. धोकादायक वाड्यांना पुनर्वसन करण्यासाठी गुरचरण जागेचा ग्रामपंचायतीने ठराव घेणे गरजेचे आहे. जर तालुक्यात सरकारी जागा असेल तर मी स्वतः शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन तहसीलदार आयुब तांबोली यांनी दिले. एनडीए समितीचे अध्यक्ष पंतप्रधान आहेत या समितीचे सदस्य पहाणी करून केले असून पुनर्वसन करण्यामध्ये भारतात इर्शाळवाडी एक नंबरवर असल्याचे कौतुक केले असल्याची माहिती तहसीलदार तांबोली यांनी दिली. त्यामुळे शासन आदिवासी बांधवांना वाऱ्यावर सोडणार नाही. तालुक्यातील आदिवासी बांधवांना खासगी कंपनीत रोजगार उपलब्ध करण्यासाठी पाठपुरावा करू, असे आश्वासनही त्यांनी या वेळी दिले.

# लैंगिक हिंसाचार रोखण्यासाठी शिक्षण आवश्यक –इशिका शेलार

**चौक, खोपोली : प्रतिनिधी**

लैंगिकतेच्या अनुषंगाने होणाऱ्या भावनिक व शारीरिक बदलांशी जुळवून घ्यायला शिकवणे, भावभावनांची देवाण घेवाण करण्यासाठी संयमित करायला शिकणे यासाठी लैंगिक व आरोग्य शिक्षण या महत्त्वाच्या गोष्टी आहेत, असे इशिका शेलार यांनी सांगितले.



सहज सेवा फाउंडेशनच्या वतीने आदिवासी दिनानिमित्त जनता विद्यालय, लौजी खोपोली येथे लैंगिक शिक्षण मार्गदर्शन कार्यशाळेचे अयोजन करण्यात आले होते. त्या वेळी इशिका शेलार बोलत होत्या.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी जनता विद्यालय, लौजीचे बुवा बोरसे, संगीता पवार, वैशाली डोईफोडे, विजया ननवरे व शालेय स्टाफ यांचे विशेष सहकार्य लाभले. सहजसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, कार्याध्यक्ष माधुरी गुजराथी, उपाध्यक्ष इशिका शेलार, सचिव अखिलेश पाटील, खजिनदार संतोष गायकर, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, महिला संघटक निलम पाटील, खालापूर तालुका प्रमुख मोहन केदार, सागरिका जांभळे यांनी परिश्रम घेतले.

# कोर्लई येथे नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील कोर्लई येथे मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कोर्लई ग्रामपंचायत सभागृहात श्री सत्यसाई संघटना, मुंबई मेट्रो प्रदेश, महाराष्ट्र आणि आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांचे विद्यमाने मंगळवारी (दि. ८) हे शिबिर घेण्यात आले.

शिबिरात एकूण १२६ जणांची नेत्र तपासणी करण्यात आली. यामध्ये ३० जणांना मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात येणार आहेत. या शिबीरासाठी श्री सत्यसाई संघटना,मेट्रो प्रदेश जिल्हा अध्यक्ष कैलास गावडे यांचे मार्गदर्शनाखाली श्री सत्यसाई संघटनेचे सुरेश मेहेर, नरेश पटेल, शिवराम पटेल, शरद वरसोलकर, रोहन पाटील, सुबोध भोसले, देवानंद हाले, अर्चना पारखी, विकास हाले, जागृती हाले यांनी विशेष परिश्रम शिबिर यशस्वी होण्यासाठी घेतले, तर आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांचे वतीने प्रकाश पाटील, डॉ. अर्पणा हरी, मृण्मयी जाधव, सोनाली पंदेरे, ज्ञानोबा कांबळे व सरपंच राजश्री मिसाळ यांचे सहकार्य लाभले.

कोर्लई येथे श्री सत्यसाई संघटना, मुंबई मेट्रो प्रदेश यांचे वतीने जिल्हाअध्यक्ष कैलास गावडे यांचे मार्गदर्शनाखाली सुरेश मेहेर, नरेश पटेल व शिवराम पटेल आणि सहकाऱ्यांनी विविध खेडेगावात १२ वेळा नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन केले आहे. यामध्ये एकूण १००० रूग्णांची डोळे तपासणी व १५०पेक्षा जास्त रूग्णांचे मोतिबिंदू ऑपरेशन करण्यात आले, अशी माहिती संघटनेचे सुरेश मेहेर यांनी दिली.

# माणगावात अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथे मुंबई–गोवा महामार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. या अपघाताची माहिती प्रियंका प्रदीप सोनावळे (वय २८, रा. नाणोरे, माणगाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

फिर्यादी प्रियंका प्रदीप सोनावळे यांचे वडील प्रदीप सुंदर सोनावळे (वय ५७, रा. नाणोरे) हे तहसील कार्यालय येथे स्प्लेंडर (एमएच ०६ सीएच ५३८०)वरून ड्युटीवर जात असताना एमआरएफ टायर शोरूमजवळ अज्ञात वाहनावरील चालकाची दुचाकीला धडक लागून अपघात घडला. या अपघातात मोटार प्रदीप सुंदर सोनावळे यांना गंभीर दुखापती होऊन त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघाताचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

# खालापूर तहसील व पंचायत समिती कार्यालयात कर्मचाऱ्यांनी घेतली पंचप्राण शपथ

**चौक : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या समारोपानिमित्त माझी माती माझा देश अभियानांतर्गत बुधवारी (दि. ९) खालापूर तहसील व पंचायत समिती कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पंचप्राण शपथ घेतली.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव कार्यक्रमाच्या समारोपीय उपक्रमांतर्गत माझी माती माझा देश अभियान राबविण्यात येत असून या उपक्रमानुसार गाव ते शहरांपर्यंत आपल्या मातीविषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी, हा या अभियानाचा उद्देश आहे. या अभियानांतर्गत पंचप्राण शपथ विविध विभागांसह, खालापूर तहसील व पंचायत समिती येथे घेण्यात आली. आम्ही शपथ घेतो की, भारतास २०४७पर्यंत आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न साकार करू, गुलामीची मानसिकता मुळापासून नष्ट करू, देशाच्या समृध्द वारशाचा गौरव करू, भारताची एकात्मता बलशाली



करू आणि देशाचे संरक्षण करणाऱ्यांप्रती सन्मान बाळगू, देशाचे नागरीक म्हणून सर्व कर्तव्यांचे पालन करू, अशी पंचप्राण शपथ घेतली. या वेळी मातीच्या पणत्या हातावर लावण्यात आल्या होत्या.

गटविकास अधिकारी संदिप कराड, नायब तहसीलदार दशरथ भोईर, सुधाकर राठोड, सहाय्यक गटविकास अधिकारी राजपूत, विस्तार अधिकारी महादेव शिंदे, अधीक्षक चोपडे, भांडारकर, अव्वल कारकून सारंग, पुरवठा अधिकारी शिंदे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कार्यालयाकडून रोहा महसूल विभागाचा सन्मान





**रोहे : प्रतिनिधी**

महसूल विभागामार्फत १ ते ७ ऑगस्टदरम्यान महसूल सप्ताह साजरा करण्यात आला. या महसूल सप्ताहामध्ये रोहा विभागाने चांगले काम केल्याने त्यांचा सन्मान जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आला.

जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात आयोजित महसूल सप्ताहाच्या सांगता समारोप कार्यक्रमात कोकण आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, अप्पर कोकण आयुक्त किसन जावळे, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, सिने अभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या हस्ते रोहा उपविभागीय व तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

सन्मानित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये इर्शाळवाडी येथे घडलेल्या दुर्घटनेच्या वेळी उत्कृष्ट उपाययोजना कामाबद्दल प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, महसूल दिनानिमित्ताने आयोजित महसूल सप्ताहांतर्गत विविध उपक्रम घेऊन उत्कृष्ट काम केल्याबद्दल तहसीलदार किशोर देशमुख, जिल्ह्यातील उत्कृष्ट नायब तहसीलदार म्हणून राजेश थोरे, उत्कृष्ट मंडळाधिकारी गुरुनाथ यमाजी यांचा सत्कार करून त्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात आले.

या वेळी रोहा विभागाने चारपानी काढलेल्या पुस्तिकेचे अनावरण कोकण आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तिकेत महसूल विभागाच्या विविध योजना, विविध दाखले, विविध अध्यादेशांची माहिती व त्यांच्या वेबसाईट देण्यात आल्या आहेत. तालुक्यातील महासेवा केंद्र, त्यांचे नंबर व त्यांचे नाव या पुस्तिकेत छापण्यात आले आहेत. रोहा तालुक्यात या पुस्तिकेच्या दोन हजार प्रति वाटप करण्यात आले आहेत. या पुस्तिकेचे कोकण विभागात वितरित करण्याचे आवाहन कोकण अप्पर आयुक्त किसन जावळे यांनी केले आहे. व्यंगचित्रकार म्हणून प्रसिद्ध असलेले मंडळ अधिकारी भरत सावंत यांनी काढलेल्या चित्राचे अनावरण कोकण आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते करण्यात आले. या सर्व बाबींचे कौतुक जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी केले आहे.

## ‘लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी आमसभेचे आयोजन करावे’

**मुरूड : प्रतिनिधी**

पावसाळी हंगाम असल्याने रस्त्याला पडलेले खड्डे, विजेची समस्यामुळे लोक त्रस्त झाले आहेत. ग्रामीण भागातील सुद्धा अनेक प्रश्न असून यासाठी आमदार महेंद्र दळवी यांनी आमसभेचे नियोजन करावे, अशी मागणी समाजसेवक अरविंद गायकर यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी सांगितले की, याबाबत मी आमदार दळवी यांच्याकडे मागणी केली असून त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याची माहिती गायकर यांनी दिली आहे. आमसभेमुळे सर्वसामान्यांचे प्रश्न समजून त्यावर योग्य तोडगा काढण्यात येईल. माझे व्यक्तिगत प्रयत्न सुरू असून लवकरच आमसभा होईल, अशी अपेक्षा या वेळी गायकर यांनी व्यक्त केली आहे. याबाबत आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले की, याच महिन्यातच मी आमसभा घेणार आहे. गायकर यांची मागणी रास्त असून याबाबत तहसीलदार व गटविकास अधिकारी यांना पत्र देणार आहे.

## हिरवळ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे युवा महोत्सवात सुयश



**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठांतर्गत घेण्यात येणाऱ्या ५६व्या युवा महोत्सवाचे (झोनल) आयोजन डी. जी. तटकरे महाविद्यालय तळा–इंदापूर येथे करण्यात आले होते. युवा महोत्सवामध्ये हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व हिरवळ रात्र महाविद्यालय यांनी ऑन द स्पॉट पेंटिंग, मेहंदी, सोलो वेस्टन गायन व सोलो भारतीय शास्त्रीय गायन, वादविवाद स्पर्धा, कार्टूनिंग, वक्तृत्व स्पर्धा व रांगोळी स्पर्धेत सहभाग घेतला होता.

स्पर्धेत तैहरीन दुस्ते वेस्टर्न सोलो गायन प्रकारामध्ये द्वितीय, मेहविश अंतुले मेहंदी स्पर्धेमध्ये द्वितीय, निदा खेडकर व वसील कालसेकर यांनी वादविवाद (इंग्लिश) स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला, तसेच हिरवळ रात्र महाविद्यालयातील शाहिद गजगे व श्रुती पुरोहित या विद्यार्थ्यांनी वादविवाद (इंग्लिश) स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे. या विद्यार्थ्यांच्या यशामागे महाविद्यालयाचे प्रा. मनिषा बर्गे व प्रा. कपिल जोशी यांचे मोलाचे परिश्रम आहेत. हिरवळ संस्थेचे अध्यक्ष किशोरजी धारिया, विद्यार्थी विकास कक्ष मुंबई विद्यापीठाचे संचालक डॉ. सुनील पाटील, मुंबई विद्यापीठ सांस्कृतिक समन्वक प्रा. निलेश सावे तसेच दक्षिण रायगड जिल्हा समन्वयक प्रा. जयेश म्हात्रे, हिरवळ संस्थेच्या संचालिका सोनाली धारिया, प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी, प्राचार्य सुदेश कदम, प्रा. राकेश वडवळकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अंतिम फेरीसाठी शुभेच्छा दिल्या.




## तोतया पोलिसांनी लुटले सोन्याचे दागिने

**खोपोली : प्रतिनिधी**

पुढे चोरी झाली आहे तपासणी सुरू आहे, त्यामुळे तुमच्याजवळ सोन्याचे दागिने रुमालात काढून ठेवा, असे सांगत तिघांनी जवळपास ५० हजार किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना खोपोलीत घडली आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र बँकेसमोर, मोचीच्या टपरीजवळ तीन अनोळखी इसमाने आपण पोलीस असून पुढे तपासणी सुरू आहे, अशी बतावणी करून फिर्यादी यांची फसवणूक करून हातातील अंगठी व गळ्यातील चैन हातरूमालामध्ये ठेवले. हातचलाखीने दागिने परत न करता खाली हातरूमाल देऊन फिर्यादींची फसवणूक केली.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सुधाकर लहाने हे करीत आहेत.

# टीम इंडियाचे टी-20 मालिकेत पुनरागमन

## तिसऱ्या सामन्यात विंडीजवर दणदणीत विजय



**गुयाना : वृत्तसंस्था**

जागतिक टी-२० क्रमवारीत अव्वल असलेल्या सूर्यकुमार यादवने धडाकेबाज फटकेबाजी करीत भारताला विंडीजविरुद्धच्या तिसऱ्या सामन्यात विजय मिळवून दिला. भारताने पाच सामन्यांच्या मालिकेतील पिछाडी १-२ अशी कमी केली. प्रथम फलंदाजी करताना विंडीजने २० षटकांत ५ बाद १५९ धावा केल्या. भारताने १७.५ षटकांत ३ बाद १६४ धावा करीत मालिकेतील आव्हान कायम राखले.

सूर्यकुमारने ४४ चेंडूंत १० चौकार व ४ षटकारांसह ८३ धावांची खेळी केली. त्याची रोहित शर्माच्या सर्वाधिक चार टी-२० शतकांच्या विश्वविक्रमाशी बरोबरी करण्याची संधीही हुकली. आंतरराष्ट्रीय टी-२० पदार्पण केलेला यशस्वी जैस्वाल (१) आणि शुभमन गिल (६) अपयशी ठरल्यानंतर सूर्या आणि तिलक वर्मा यांनी ५१ चेंडूंत ८७ धावांची भागीदारी करीत भारताचा विजयी मार्ग सुकर केला. तिलकने ३७ चेंडूंत ४ चौकार व एका षटकारासह नाबाद ४९ धावा केल्या. अल्झारी जोसेफने १३व्या षटकात सूर्याला बाद केल्यानंतर तिलक व कर्णधार हार्दिक पांड्या (२०*) यांनी ३१ चेंडूंत नाबाद ४३ धावांची विजयी भागीदारी करीत विजय पक्का केला.

त्याआधी, कुलदीप यादवने २८ धावांत ३ प्रमुख फलंदाज बाद करीत विंडीजच्या फलंदाजीला खिंडार पाडले. विंडीजकडून सलामीवीर ब्रँडन किंग आणि कर्णधार रोवमन पॉवेल यांनी फलंदाजीत छाप पाडली. किंगने ४२ चेंडूंत ५ चौकार व एका षटकारासह ४२ धावा केल्या.

तिलक वर्माने तिसऱ्या टी-२० सामन्यात ३७ चेंडूत १ षटकार आणि ४ चौकारांच्या मदतीने नाबाद ४९ धावा केल्या. त्याने वेस्ट इंडिजविरुद्धच्या तीन टी-२० सामन्यांमध्ये ३९, ५१ आणि ४९* धावा केल्या आहेत.

यानंतर, तो भारतासाठी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पहिल्या तीन डावात सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत गौतम गंभीरला मागे टाकले आहे.

### गोंधळामुळे सामन्यास उशीर

तिसऱ्या टी-२० सामन्यासाठी विंडीज आणि भारताचे खेळाडू मैदानात उतरल्यानंतर लगेच सर्व जण माघारीही फिरले. मैदानात ३० यार्डचा सर्कल आखलाच गेला नसल्याने सर्व खेळाडू माघारी फिरले. यामुळे सामना काही मिनिटे उशिराने सुरू झाला. अशा प्रकारे सामन्याला उशीर होण्याची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ही पहिलीच वेळ असल्याचे सांगितले जात आहे.

# बीसीसीआयने २०२१-२२मध्ये केली अब्जावधींची कमाई

**मुंबई : प्रतिनिधी**





भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) सध्या जागतिक क्रिकेटमधील सर्वात श्रीमंत क्रिकेट बोर्ड आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षात बीसीसीआयने कोट्यवधी रुपयांचा आयकर सरकारकडे जमा केला यावरूनही याचा अंदाज लावता येतो. बीसीसीआयची या आर्थिक वर्षात एकूण कमाई ७,६०६ कोटी रुपये होती. त्यानंतर बीसीसीआयने सरकारला एकूण १,१५९ कोटी रुपये दिले, मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत ३७ टक्के अधिक कर भरला आहे.

भारत सरकारचे अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी ८ ऑगस्ट रोजी राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना बीसीसीआय आयकर जमा करत असल्याची माहिती दिली. या वेळी त्यांनी बीसीसीआयचे गेल्या पाच वर्षांतील उत्पन्न आणि त्यानंतर जमा झालेल्या कराची संपूर्ण माहिती दिली आहे.

२०२०मध्ये जेव्हा जगभरात कोरोना महामारीचा प्रभाव दिसत होता, तेव्हा त्याचा परिणाम बीसीसीआयच्या कमाईवरही दिसून आला होता. बायो-बबलमध्ये क्रिकेट सामने होत असल्याने खर्चात वाढ झाली होती आणि स्टेडियममध्ये चाहत्यांच्या येण्यावर बंदी असल्याने त्याचा परिणाम कमाईवरही दिसून आला होता.

बीसीसीआयसाठी आयसीसीच्या महसूल संचातून मिळणारे उत्पन्न हा फक्त एक स्रोत आहे. बीसीसीआयला इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) आयोजनातून आणखी एक मोठी रक्कम मिळते, ज्यामुळे त्यांना खूप मोठी रक्कम मिळते. खेळाडूंचा सहभाग आणि प्रायोजकत्व या दोन्ही बाबतीत आयपीएल ही जगातील सर्वांत फायदेशीर लीग राहिली आहे.

# विश्वचषकातील नऊ सामन्यांमध्ये बदल; भारत-पाकिस्तान लढतीची तारीखही बदलली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतात होणाऱ्या विश्वचषकाला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. १० संघामध्ये राऊंड रॉबिन पद्धतीने विश्वचषक होणार आहे. स्थानिक स्थिती आणि काही संघाच्या विनंतीनंतर आयसीसीने विश्वचषकाच्या वेळापत्रकात बदल केला आहे. आयसीसीने नऊ सामन्यांच्या तारखा बदलल्या आहेत. यामध्ये भारताचे दोन सामन्यांचा समावेश आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात १५ ऑक्टोबर रोजी होणारा सामना आता १४ ऑक्टोबर रोजी होणार आहे. हा सामना अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडिअमवरच होणार आहे.

५ ऑक्टोबरपासून विश्वचषकाच्या रनसंग्रामाला सुरुवात होणार आहे. गतविजेते आणि उपविजेत्यामध्ये सलामीची लढत होणार आहे. इंग्लंड आणि न्यूझीलंड या दोन संघामध्ये पाच ऑक्टोबर रोजी नरेंद्र मोदी स्टेडिअमवर सामना होणार आहे. १९ नोव्हेंबर रोजी अंतिम सामनाही नरेंद्र मोदी स्टेडिअमवरच होणार आहे. भारताची सलामीची लढत ऑस्ट्रेलियाविरोधात ८ ऑक्टोबर रोजी होणार आहे. यंदाचा विश्वचषक १० संघामध्ये राऊंड रॉबिन पद्धतीने होणार आहे. प्रत्येक संघाचे कमीत कमी नऊ सामने होणार आहेत. विश्वचषकासाठी संघ घोषणा करण्याची अखेरची तारीख २७ सप्टेंबर इतकी आहे. आतापर्यंत फक्त ऑस्ट्रेलियाने आपल्या संभावित संघाची घोषणा केली आहे.

सात वर्षांनंतर पाकिस्तानी संघ भारतात येणार आहे. त्यामुळे भारतीय क्रिकेट चाहत्यांना भारत विरुद्ध पाकिस्तान हा महासंग्राम पाहण्याची संधी मिळणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील बहुप्रतिक्षित वनडे विश्वचषक सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. विश्वचषकापूर्वी पाकिस्तानी संघ फिजिओलॉजिस्टच्याही शोधात आहे. विश्वचषकात पाकिस्तानचा पहिला सामना ६ ऑक्टोबर रोजी नेदरलँड्सविरुद्ध होणार आहे. दुसरीकडे, १४ ऑक्टोबरला पाकिस्तानचा भारताविरुद्ध मोठा सामना होणार आहे.

# साताऱ्याची काजल करणार ज्युनिअर हॉकी संघाचे नेतृत्व



**सातारा: प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील ऊसतोड करणाऱ्या दामप्त्याच्या लेकीने कौतुकास्पद कामगिरी केली. माणदेशातील वरकुटे-मलवडीजवळील पाटलुची वस्ती येथील ऊसतोड मजूर सदाशिव आटपाडकर आणि नकुसा आटपाडकर यांची मुलगी काजलने भारतीय हॉकी संघात स्थान पटकावले आहे. आंतरराष्ट्रीय खेळाडू काजल आटपाडकर ही जर्मनीतील ड्युसेलडॉर्फ येथे चार देशांच्या ज्युनिअर हॉकी स्पर्धेचे नेतृत्व करणार आहे.

काजलच्या यशामागचे श्रेय खऱ्या अर्थाने तिच्या शिक्षकांबरोबर आई-वडिलांचेही आहे. जे आईवडील ऊसतोड कामगार म्हणून सहा सहा महिने गावोगावी फिरून पालावर राहतात, तर राहिलेले सहा महिने गावाकडे येऊन मिळेल तेथे मजुरी करतात. मजुरी करून कुटुंब चालवणारे नकुसा आटपाडकर आणि सदाशिव आटपाडकर यांची मुलगी काजलने अटकेपार झेंडा फडकावून भारताचे नाव रोशन करण्यासाठी ती जिद्दीने हॉकी स्पर्धेत उतरली आहे. तिच्या झालेल्या निवडीबद्दल सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.



# मनोज तिवारीने निवृत्तीचा निर्णय घेतला मागे

**प. बंगाल : वृत्तसंस्था**

पाच दिवसांपूर्वीच सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करणारा क्रिकेटपटू मनोज तिवारीने आपली निवृत्ती मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. तो यापुढेही देशांतर्गत क्रिकेटमध्ये बंगालकडून खेळणार आहे. तो ममता सरकारमध्ये क्रीडामंत्री आहे. गेल्या आठ वर्षांपासून त्याला भारतीय संघात स्थान मिळाने नाही. त्यानंतर त्याने क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली, पण आता मनोज तिवारीने निवृत्तीचा निर्णय बदलला आहे. तो पुन्हा एकदा बंगालकडून क्रिकेट खेळताना दिसणार असल्याचे एका पत्रकार परिषदेत जाहीर केले.


कोलकात्याच्या ईडन गार्डन्स येथे झालेल्या पत्रकार परिषदेत मनोज तिवारीने निवृत्ती मागे घेण्याची घोषणा केली. या वेळी त्यांच्यासोबत बंगाल क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष स्नेहशिष गांगुलीही उपस्थित होते. संभाषणादरम्यान, मनोज तिवारीने यांनी निवृत्तीनंतर यू-टर्न घेण्याचा निर्णय का घेतला हे स्पष्ट केले. या क्रिकेटपटूने सांगितले की, त्याने आपला निर्णय बदलण्याचा निर्णय घेतला आहे आणि रणजी करंडक जिंकण्यासाठी आणखी एक प्रयत्न करायचा आहे.

मनोज तिवारी म्हणाला, गेल्या मोसमात बंगालचे कर्णधारपद भूषवून अंतिम फेरी गाठणे हा माझ्यासाठी अभिमानाचा क्षण होता. खेळाला अलविदा करण्यापूर्वी मला हे जेतेपद पुन्हा एकदा मिळवायचे आहे. मी पुढच्या वर्षी दुसऱ्यांदा यू-टर्न घेणार नाही, मला बंगाल क्रिकेटला आणखी एक वर्ष द्यायचे आहे.

# बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटना व आयडियल ग्रुप-स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे १२ ऑगस्टला क्रीडाप्रेमी स्व. चारुशीला मोहिते स्मृती चषकासाठी ७, १३, १५ वर्षाखालील वयोगटांची निवड चाचणी जलद बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.



आरएमएमएस सहकार्याने परळ येथे होणारी ही बुद्धिबळ स्पर्धा कुलाबा ते चुनाभट्टी अथवा माहीम येथील परिसरात राहणाऱ्या वयोगटातील खेळाडूंसाठी मर्यादित आहे. ७ व १३ वर्षांखालील गटातून प्रत्येकी पहिले दोन आणि १५ वर्षांखालील गटातून पहिले चार विजेते-उपविजेते राज्य निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेसाठी मुंबई शहराचे प्रतिनिधित्व करतील.

सात वर्षांखालील खुला गट, सात वर्षांखालील मुली गट, १३ वर्षांखालील खुला गट, १३ वर्षांखालील मुली गट, १५ वर्षांखालील खुला गट आणि १५ वर्षांखालील मुली गट अशा एकूण सहा गटांत स्पर्धा साखळी पद्धतीने होणार असून प्रत्येक फेरी १५ मिनिटे अधिक तीन सेकंद इन्क्रिमेंटची राहील. प्रत्येक गटातील प्रत्येकी पहिल्या पाच मुलांसाठी व मुलींसाठी पुरस्कार दिला जाईल.

स्पर्धकांची एमसीए नोंदणी असणे अनिवार्य आहे. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सेक्रेटरी राजाबाबू गजेंगी अथवा गणेश पाटील (९७०२९३४९३५) यांच्याकडे १० ऑगस्ट ८ वाजेपर्यंत संपर्क साधावा.

# द हंड्रेड टूर्नामेंटमध्ये विचित्र पद्धतीने बटलर धावचीत

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

द हंड्रेड टूर्नामेंटमध्ये मँचेस्टर ओरिजिनल्सचा कर्णधार जोस बटलर सोमवारी ओल्ड ट्रॅफर्ड येथे बर्मिंगहॅम फिनिक्सविरुद्ध खेळताना विचित्र पद्धतीने धावबाद झाला. थर्ड अंपायरने बटलरला बाद ठरवले आणि तो रागाच्या भरात तिथून ड्रेसिंगरूममध्ये निघून गेला.


बटलरने तुफानी फलंदाजी करताना धडाकेबाज अर्धशतक झळकावले. त्याने सलामीवीर म्हणून पाच षटकार आणि तीन चौकारांच्या मदतीने ६२ धावा केल्या. बेनी हॉवेलने टाकलेल्या चेंडूवर बटलर धावचीत झाला. बटलरने तो शॉट मिड-ऑफच्या दिशेने खेळला होता, पण मोईन अलीने जबरदस्त थ्रो केला. तो चेंडू थेट स्टंपवर जाऊन आदळला आणि बेल्स उडाल्या. त्या वेळी त्याला त्याची बॅट व्यवस्थित ग्राउंड करता आली नाही. दरम्यान, पावसामुळे हा सामना पूर्ण झाला नाही. त्यामुळे या सामन्याचा निकाल लागू शकला नाही.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com